नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार, दि. ३१ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# '...तर मग लग्नच कशाला करता?'

## हुंड्यासाठी होणाऱ्या विवाहितांच्या छळावर सर्वोच्च न्यायालयाचा संतप्त सवाल

**मुंबई : (स. गांवकरी)**


"मुले लग्न कशासाठी करतात? लग्न करून आणायचं आणि नंतर मुलगी अन् तिच्या कुटुंबीयांचा अपमान करायचा, हे कशासाठी?" असा संतप्त प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. छत्तीसगडमधील एका संशयास्पद हुंडाबळी प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कडक टिप्पणी केली. लग्नानंतर अवघ्या काही वर्षांतच हुंड्यासाठी होणाऱ्या विवाहितांच्या छळाबाबत सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. समाजात अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी आणि योग्य तो धडा शिकवण्यासाठी कठोर संदेश जाणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना यांनी हुंडा घेणाऱ्यांना खडे बोल सुनावले. "लग्नानंतर सुनेस आणि तिच्या माहेरच्या लोकांना सातत्याने अपमानित केले जाऊ शकत नाही, हा संदेश समाजापर्यंत स्पष्टपणे पोहोचला पाहिजे," अशा कडक शब्दांत खंडपीठाने सुनावले.

यासोबतच, या प्रकरणात दोषी ठरलेल्या पतीच्या नातेवाइकांना कोणताही दिलासा देण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. छत्तीसगडमधील कनिष्ठ न्यायालय आणि छत्तीसगड उच्च न्यायालयाने या प्रकरणातील आरोपींना दोषी ठरवले होते. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या खालील कलमांनुसार गुन्हा सिद्ध झाला होता.

- कलम ३०४ ब: हुंडाबळी (Dowry Death)
- कलम ३०६: आत्महत्येस प्रवृत्त करणे (Abetment to Suicide)
- कलम ४९८ अ: विवाहितेचा छळ आणि क्रूरता (Cruelty and Harassment)

हे संपूर्ण प्रकरण २०१० मधील छत्तीसगडमधील आहे. लग्न झाल्यानंतर अवघ्या तीन वर्षांच्या आत एका महिलेचा तिच्या सासरच्या घरी संशयास्पद अवस्थेत गळफास घेतलेला मृतदेह आढळून आला होता. सरकारी पक्षाच्या युक्तिवादानुसार, लग्नानंतर सासरच्या लोकांकडून पैशांची आणि गाडीची सातत्याने मागणी केली जात होती. या हुंड्याच्या मागणीसाठी पती आणि त्याच्या नातेवाइकांनी पीडितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केला होता. कनिष्ठ न्यायालयाने नमूद केले होते की, लग्नानंतर





सात वर्षांच्या आत या महिलेचा अनैसर्गिक मृत्यू झाला आहे. कायद्यानुसार, लग्नानंतर सात वर्षांच्या आत मृत्यू झाल्यास आणि छळाचे पुरावे असल्यास तो हुंडाबळी मानला जातो. वैद्यकीय अहवालातही गुदमरून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. मृत्यूच्या काही काळ आधीही तिच्याकडे पैशांची मागणी झाल्याचे माहेरच्यांच्या साक्षीवरून सिद्ध झाले होते.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. मृत महिलेच्या दिराने (पतीच्या लहान भावाने) कनिष्ठ न्यायालयाच्या शिक्षेविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. मात्र, त्याला कोणताही दिलासा देण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना यांनी सासरच्या मंडळींच्या वर्तनावर तीव्र आक्षेप घेतला. त्यांनी विचारले की, "लग्नानंतर मुलीचा आणि तिच्या आई-वडिलांचा सतत अपमान करण्याची ही कोणती प्रवृत्ती आहे? अशा प्रवृत्तींना आळा बसलाच पाहिजे आणि छळ करणाऱ्यांना कडक संदेश मिळायलाच हवा." सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान दोषी दिराच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, "माझ्या अशिलावर केवळ कौटुंबिक छळाचे (कलम ४९८ अ) आरोप आहेत आणि त्याला शिक्षा देण्यासाठी हे आरोप पुरेसे नाहीत." मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी वकिलांना फटकारताना म्हटले, "तुम्हाला केवळ ४९८ अ अंतर्गत फक्त तीन वर्षांचीच शिक्षा झाली आहे, यातच तुम्ही आनंद मानला पाहिजे." लग्न झाल्यावर सासरच्या घरी मुलींना आर्थिक आणि मानसिक पातळीवर ज्या त्रासाला सामोरे जावे लागते, त्या वाढत्या प्रवृत्तीवरही न्यायालयाने यावेळी तीव्र चिंता व्यक्त केली. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे हुंड्यासाठी छळ करणाऱ्यांना आता कायद्याचा तीव्र तडाखा बसेल, हे स्पष्ट झाले आहे.

## टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जींवर हल्ला

**मुंबई : (स. गांवकरी)**



■ अंडी फेकली, शर्ट फाडला अन् 'चोर, चोर' अशी घोषणाबाजी; बंगालमध्ये खळबळ

टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही अज्ञात व्यक्तींनी अंडी फेकत त्यांचा शर्ट फाडला आहे. तसेच यावेळी अभिषेक बॅनर्जी यांच्या दौऱ्यादरम्यान 'चोर, चोर' अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पश्चिम बंगालमधील सोनारपूरमध्ये ही घटना शनिवारी घडली आहे. या घटनेनंतर सोनारपूरमध्ये मोठा तणाव निर्माण झाला आहे. दरम्यान, पश्चिम बंगालमधील सोनारपूर या ठिकाणी अभिषेक बॅनर्जी हे निवडणुकीनंतरच्या हिंसाचारातील पीडितांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी गेले होते. मात्र, यावेळी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला असल्याचं सांगितलं जात आहे. त्यांच्या या दौऱ्यादरम्यान अभिषेक बॅनर्जी यांच्यावर अंडी फेकत दगडफेक करण्यात आली, तसेच त्यांचा शर्ट फाडण्यात आल्याचा आरोपही टीएमसीने केला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे. खासदार अभिषेक बॅनर्जी हे सोनारपूर या ठिकाणी निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचाराच्या घटनेतील पीडितांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी गेले होते.

## डी. के. शिवकुमार यांची काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड


**मुंबई : (स. गांवकरी)**



कर्नाटकच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. सिद्धरामय्या यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या आधीच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. आता डी.के. शिवकुमार यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदी वर्णी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर आज (३० मे) डी.के.शिवकुमार यांची कर्नाटक काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. दरम्यान, आता डी.के.शिवकुमार हे कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री म्हणून येत्या ३ जून रोजी मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला असून आता नव्या मंत्रिमंडळात नेमकं कोणाचा समावेश होतो? याकडे कर्नाटकच्या जनतेचं लक्ष लागलं आहेत. या संदर्भातील माहिती काँग्रेसचे नेते के.सी.वेणुगोपाल यांनी दिली आहे. डी.के.शिवकुमार यांची आज काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली आहे. आता डी.के.शिवकुमार यांच्या मुख्यमंत्री पदाचा शपथविधी सोहळा ३ जून रोजी बंगळुरू येथील लोकभवनात पार पडणार असल्याची माहिती काँग्रेस पक्षाच्यावतीने सांगण्यात येत आहे.


## "मैं वापस आऊंगी!"

**मुंबई : (स. गांवकरी)**



■ एशिअन गेम्सच्या ट्रायल्समध्ये विनेश फोगटचा धक्कादायक पराभव; WFI अध्यक्षांकडे बोट दाखवत दिला इशारा

विनेश फोगटचे २०२६ च्या आशियाई खेळांसाठीच्या भारतीय संघात स्थान मिळवण्याचे स्वप्न शनिवारी संपुष्टात आले. राजधानी नवी दिल्ली येथे झालेल्या निवड चाचणीत महिलांच्या ५३ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत तिला मीनाक्षी गोयलविरुद्ध ४-६ असा पराभव पत्करावा लागला. या अटीतटीच्या लढतीत विनेश आणि मीनाक्षी यांच्यात बहुतांश वेळ गुणांसाठी चुरस पाहायला मिळाली. मात्र, मीनाक्षीने निर्णायक क्षणी आपला संयम राखला आणि महत्त्वाच्या वेळी आघाडी कायम ठेवत अंतिम फेरीत धडक मारली.



## थोडक्यात पण महत्वाचे



### डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीला जिल्हास्तरीय समितीची भेट

भिवंडी (स. गांवकरी) : 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे जिल्हास्तरीय समितीने भेट देत ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांचे मूल्यांकन केले. या भेटीदरम्यान समितीने ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची पाहणी केली. तसेच स्वच्छता, पाणीपुरवठा, डिजिटल सेवा, ग्रामविकास कामे, नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा आणि शासनाच्या योजनांची अंमलबजावणी याबाबत माहिती घेतली. ग्रामपंचायतीने केलेल्या कामांचे सादरीकरण समितीसमोर करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबाबत समितीने समाधान व्यक्त करत पुढील कामांसाठी मार्गदर्शन केले. 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या विकासकामांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन दिले जात आहे.



### वघई तालुका पंचायतमध्ये भाजप समर्थित अध्यक्षांनी स्वीकारला पदभार

पेटा (स. गांवकरी) : डांग जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राजेशभाई गामीत, उपाध्यक्ष उषाबेन धर्मेश पटेल तसेच वघई तालुका पंचायतच्या अध्यक्षा शकुंतलाबेन पाडवी यांनी विकासकामांना अधिक गती देण्याची व्यक्त केली बांधिलकी. डांग जिल्हा परिषदेचे नवनियुक्त अध्यक्ष म्हणून राजेशभाई मनसुभाई गामीत तसेच उपाध्यक्ष म्हणून उषाबेन धर्मेशभाई पटेल यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी जिल्हा परिषदेचे सदस्य, अधिकारी, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी डांग जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी, ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी तसेच जनहिताच्या कामांना प्राधान्य देण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. याचबरोबर डांग जिल्ह्यातील वघई तालुका पंचायतच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भाजप समर्थित नवनियुक्त अध्यक्षांनी आज अधिकृतपणे पदभार स्वीकारला. वघई तालुका पंचायतमध्ये भाजप कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. वघई तालुका पंचायतच्या अध्यक्षा म्हणून शकुंतलाबेन सुभाषभाई पाडवी यांनी विधिवत पदभार स्वीकारला. डांग जिल्हा परिषद आणि वघई तालुका पंचायतमधील पदभार स्वीकार समारंभावेळी अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. यावेळी डांग जिल्हा भाजप प्रभारी राजेशभाई देसाई, आमदार विजयभाई पटेल, संघटन अध्यक्ष किशोरभाई गावीत, महामंत्री बुधु कामडी, माजी महामंत्री धर्मेश पटेल, मंडळ अध्यक्ष पंकज पटेल यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर डांग जिल्हा परिषद आणि वघई तालुका पंचायतमधील विकासकामांना अधिक वेग मिळेल, अशी आशा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### आळेफाटा एसटी स्टँडवर तरुणीच्या चेहऱ्यावर ब्लेडने वार

आळेफाटा (स. गांवकरी) : आळेफाटा एस. टी. स्थानक परिसरात बुधवारी सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. २० वर्षीय तरुणीवर तिच्याच लिव्ह-इन पार्टनरने ब्लेडने हल्ला केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. आळेफाटा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला आहे. पोलिसांकडून त्याचा कसून शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आरोपी नागेश भगवान थोरात याच्यासोबत काही काळ लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. त्यांना दोन मुलीही आहेत. मात्र, आरोपीच्या दारूच्या व्यसनामुळे सतत वाद होत असल्याने ती काही दिवसांपूर्वी मुलांसह आळेफाट्यात येऊन राहत होती. सदर तरुणी १४ नंबर परिसरातील एका कला केंद्रात नृत्यांगना म्हणून काम करत होती. बुधवारी सकाळी पीडित तरुणी तिच्या मैत्रिणीसोबत एस.टी. स्थानक परिसरात खरेदीसाठी आली असताना आरोपी नागेश तेथे आला. त्याने पीडितेला पुन्हा लातूरला सोबत येण्याचा आग्रह केला. मात्र, तिने नकार दिल्यानंतर संतापलेल्या नागेशने खिशातून ब्लेड काढून तिच्या चेहऱ्यावर आणि कानाजवळ वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

### शिर्डीत लक्षवेधी राज्यस्तरीय लोककलावंत महामेळावा २०२६ चे आयोजन

आळेफाटा (स. गांवकरी) : श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या सहकार्याने तसेच अन्याय, अत्याचार विरोधी युवा व महिला संघटना महाराष्ट्र व लोककलावंत सांस्कृतिक विचार मंच महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'लक्षवेधी राज्यस्तरीय लोककलावंत महामेळावा २०२६ ' चे आयोजन करण्यात आले आहे. या महामेळाव्यात 'राष्ट्रीय साई जीवन गौरव पुरस्कार' प्रदान सोहळा बुधवार दि. ३जून २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता श्री साईबाबा मंदिर गेट नं. ३जवळ, शिर्डी येथे मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. या महामेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक लोककलावंत सांस्कृतिक विचार मंच, महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. गवनेरजी सरोदे साहेब हे आहेत. या सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून खासदार भाऊसाहेब वाकचौरे, श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. गोरक्ष गाडीलकर, चेअरमन डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्यासह आमदार डॉ. किरणजी लहामटे, आमदार अमोल खताळ, आमदार अक्षय कर्डिले, आमदार दौलतराव दरोडा, आमदार शांताराम मोरे, आमदार विवेकभैय्या कोल्हे, आमदार किसनराव कातोरे, जि.प. उपाध्यक्ष सुजित झावरे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे आयुक्त श्रीराम पांडे, सहायक संचालक नितीनजी बलखंडे, आयुक्त लीना बनसोड, जिल्हा परिषद सदस्या कल्पनाताई काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. "शिर्डीस ज्याचे लागतील पाय, टळती अपाय सर्व त्याचे" या साईवचनाला सार्थ ठरवत हा महामेळावा आयोजित केला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोककलेची सेवा करणाऱ्या कलावंतांना एका व्यासपीठावर आणून त्यांच्या कलेला प्रोत्साहन देणे व 'राष्ट्रीय साई जीवन गौरव पुरस्कारा'ने त्यांचा यथोचित सन्मान करणे हा या महामेळाव्याचा मुख्य उद्देश आहे.

# गंडा घालणाऱ्या प्रशांत गवळीला ठोकल्या बेड्या

खोडद : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्या मधील नारायणगाव येथील समर्थ क्रॉप केअर या कंपनीमार्फत इन्व्हेस्टमेंट धारकांची फसवणूक करण्यात आली आहे. अनेक गुंतवणूकदारांच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम समर्थ क्रॉप केअर या इन्व्हेस्टमेंट कंपनीने केलेले आहे. पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील चाळीस हजाराहून अधिक गुंतवणूकदारांचे पैसे अवघ्या दहा महिन्यात दाम दुप्पट करून देतो या बोलीवर या कंपनीने घेतले आणि त्यानंतर सुरुवातीच्या काही महिन्यांमध्ये या गुंतवणूकदारांना त्यांचा हक्क देण्यात आला. परंतु त्यानंतर मात्र कंपनी दिवाळखोरीत निघाल्याचे कारण सांगून, या गुंतवणूकदारांचे पैसे देणं बंद करण्यात आले.समर्थ क्रॉप केअर चे संस्थापक अध्यक्ष प्रशांत गवळी यांनी हा संपूर्ण प्लॅन रचला .ही संपूर्ण माया गोळा केली आणि ही संपूर्ण माया गोळा करून या ठिकाणी जे इन्व्हेस्टमेंट करतायेत त्यांना काहीतरी स्टार्टअप दाखवायला पाहिजे, काहीतरी बिजनेस दाखवायला पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी नारायणगाव येथे खडीमशीन जवळ प्रशांत गवळीने गोफार्मली नावाचा स्टार्टअप सुरू केला. फळे, भाजीपाला या शेत मालावरती प्रक्रिया करून या ठिकाणी ती एक्स्पोर्ट इम्पोर्ट केली जातील,अशा स्वरूपात शेतकऱ्यांना भुरळ पाडली गेली. शेतकऱ्यांना येथे बोलवण्यात आले .शेतकऱ्यांना हा प्रोजेक्ट दाखवला गेला आणि हा प्रोजेक्ट पाहून शेतकऱ्यांनी आपले पैसे अगदी कुठलीही चौकशी न करता या प्रशांत गवळीच्या ताब्यात दिले .परंतु हे संपूर्ण जाळ केवळ लोकांना भूल ,थापा देण्यासाठी पसरवण्यात आलं होतं, आणि अवघ्या काही दिवसांमध्ये नारायणगाव मध्ये असणारा हा गोफार्मली ज्याच्या उद्घाटनासाठी जुन्नर ,आंबेगाव येथील अनेक मान्यवर ,बडे नेते या ठिकाणी उद्घाटनाला आले होते. नारायणगाव, जुन्नर ,आंबेगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी गोफार्मली किंवा ही समर्थक क्रॉप केअर ज्याच्यामध्ये आपली लाखो रुपयांची इन्वेस्टमेंट सुद्धा केलेली आहे. आणि त्यामुळे या संपूर्ण गुंतवणूकदारांच्या तोंडाला मात्र समर्थ क्रॉप केअर चे संस्थापक प्रशांत गवळी आणि त्यांच्या सर्व साथीदारांनी मिळून पाणी पुसलेले आहे. आज हे संपूर्ण गुंतवणूकदार चकरा मारतात, हेलपाटे मारतात ,बऱ्याचशा पोलीस स्टेशनमध्ये यांच्याविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

अखेर त्या प्रयत्नांना यश येत प्रशांत गवळीला अटक केली असून सध्या तो पोलीस कोठडीत आहे. परंतु पूर्ण प्रक्रियेमध्ये जरी आरोपी कोठडीत असला तरी गुंतवणूकदारांना काय मिळालं .आज हे गुंतवणूकदार मागणी करतायेत की प्रशांत गवळीची असणारी संपूर्ण मालमत्ता या ठिकाणी ताब्यात घेण्यात यावी आणि आमचे पैसे आम्हाला परत करण्यात यावे. परंतु अशा स्वरूपाची कुठलीही प्रक्रिया सरकारद्वारे राबवली गेलेली नाही आणि त्यामुळे निराशे पोटी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी गुंतवणूकदारांना या ठिकाणी पैशांची गरज आहे. ती गरज त्यांची भेटत नाही ,तो पैसा भेटत नाहीये आणि जे काही जमा केलेले पैसे होते ते या समर्थक क्रॉप केअर मध्ये गुंतवल्यामुळे आज हा पैसा नसल्यामुळे आत्महत्या करण्याची पाळी, नव्हे तर एका गुंतवणूकदाराने आत्महत्या सुद्धा केलेली आहे. आणि त्यामुळे एकंदरच ही संपूर्ण गुंतवणूकदार अडचणीत सापडलेले आहेत आणि त्यामुळे सर्व जागरूक गुंतवणूदारांनी गुंतवणूक करताना जी काही आपण गुंतवणूक करतोय ती सुरक्षित हातामध्ये करतोय का याची खात्री करावी. खऱ्या अर्थाने समर्थक क्रॉप केअर यांना कुठल्याही परवानग्या नव्हत्या सरकारी परवानगी नसताना यांनी अशा बनावट स्वरूपाचा उद्योग सुरू करून लोकांच्या, गुंतवणूकदारांच्या डोळ्यामध्ये धूळ फेकण्याचं मोठं पाप केलेलं आहे ,आणि हे पाप त्या काळात असणाऱ्या त्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुद्धा झाकण्याचं काम केलेल आहे.

त्यामुळे आज या कंपनीमध्ये ज्यांनी गुंतवणूक केली ते गुंतवणूकदार मात्र रस्त्यावर आलेले आहेत आणि या ठिकाणी कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या आहेत आणि त्यामुळे नेहमी सतर्क राहीले पाहिजे .आपल्या कष्टाचा पैसा घामाचा पैसा गुंतवताना तो आपण एका चांगल्या ठिकाणी सरकारी असलेल्या योजनांमध्ये किंवा जबाबदार हातामध्ये सोपवला पाहिजे. नाहीतर अशा स्वरूपात आपल्याला पश्चाताप करण्याची वेळ येते.

## विहीरआंबा गावातील खापरीजवळचा कॉजवे जीर्ण अवस्थेत

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

- ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून करावी लागते ये-जा, तात्काळ दुरुस्तीची मागणी

डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातून मिळालेल्या माहितीनुसार, ग्रुप ग्रामपंचायत उमरपाडा अंतर्गत येणाऱ्या विहीरआंबा गावातील खापरीच्या कोपर्यावर बांधलेला कॉजवे सध्या अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत पोहोचला असून, स्थानिक ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा अगदी तोंडावर आला असताना हा कॉजवे पूर्णपणे कोसळण्याच्या स्थितीत असल्याने हजारो नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे तात्काळ दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विहीरआंबा गावातील खापरीच्या कोतरावर असलेला हा कॉजवे परिसरातील ग्रामस्थांसाठी मुख्य दळणवळणाचा मार्ग असून गावाची जीवनवाहिनी मानला जातो. शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, शेतीमाल बाजारात नेणारे शेतकरी, रोजंदारीसाठी जाणारे कामगार तसेच आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयात जाणारे रुग्ण हे सर्वजण याच मार्गावर अवलंबून आहेत. मात्र सध्या कॉजव्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, त्यावरून प्रवास करताना कधीही मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे ग्रामस्थ भीतीच्या वातावरणात ये-जा करण्यास मजबूर झाले आहेत. ग्रामस्थांनी चिंता व्यक्त करताना सांगितले की, दरवर्षी पावसाळ्यात या कॉजव्यावरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहतो.

## पारनेर बाजार समितीत कांद्याला १७ ते १८ रुपये भाव

पारनेर : (स. गांवकरी)

- १५ हजार गोण्यांची आवक
- बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांची माहिती



गेल्या अनेक महिन्यांपासून कांद्याच्या दरात सातत्याने होणाऱ्या पडझडीमुळे हवालदिल झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अखेर काहीसा दिलासा मिळाला आहे. पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बुधवार, २७ मे रोजी झालेल्या लिलावात चांगल्या प्रतीच्या गावरान कांद्याला प्रति किलो १७ ते १८ रुपये म्हणजेच १७०० ते १८०० रुपये प्रति क्विंटल इतका समाधानकारक भाव मिळाला आहे. बुधवारच्या या लिलावात बाजार समितीच्या आवारात सुमारे १४ हजार १३० कांदा गोण्यांची मोठी आवक झाली होती, अशी माहिती बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर आणि उपसभापती संदीप सालके यांनी दिली. गेल्या अनेक महिन्यांपासून बाजारात कांद्याला अपेक्षित आणि योग्य भाव मिळत नव्हता. त्यामुळे बाजार समितीमध्ये माल विक्रीला न आणता अनेक कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कांदा चाळीमध्ये साठवून ठेवण्याला प्राधान्य दिले होते. मात्र, बुधवारी कांद्याच्या दरात काहीशी वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. बाजारात दर्जेदार कांद्याची मागणी वाढल्याने घसरलेले भाव पुन्हा थोडे वधारले आहेत. या बाजारभाव सुधारणेमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. बाजार समितीचे सचिव सुरेश आढाव आणि माजी सभापती बाबासाहेब तरटे यांनी लिलावातील वेगवेगळ्या प्रतीच्या कांदा दराची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार, बुधवारच्या लिलावात सर्वोत्तम दर्जाच्या १९९ गोणी कांद्याला १७०० ते १८०० रुपये प्रति क्विंटलचा सर्वोच्च भाव मिळाला. याखालोखाल १ नंबर दर्जाच्या कांद्याला १५०० ते १६०० रुपये भाव मिळाला, तर २ नंबर दर्जाचा कांदा १२०० ते १४०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला गेला. बाजारात ३ नंबरच्या कांद्याला ८०० ते ११०० रुपये आणि सर्वात खालच्या म्हणजेच ४ नंबरच्या हलक्या प्रतीच्या कांद्याला २०० ते ७०० रुपये प्रति क्विंटल इतका बाजारभाव मिळाला आहे. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी पारनेर बाजार समितीच्या आवारात रविवार, बुधवार आणि शुक्रवार असे आठवड्यातील तीन दिवस कांदा लिलाव अधिकृतपणे सुरू ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती सभापती गंगाराम बेलकर व उपसभापती संदीप सालके यांनी दिली. अनेकदा मध्यस्थ किंवा व्यापारी थेट शेतावर जाऊन शेतकऱ्यांची अडवणूक करण्याची किंवा कमी भावात माल खरेदी करण्याची शक्यता असते. त्यामुळे आपली कोणतीही आर्थिक फसवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी आपला कांदा शेतावर न विकता थेट बाजार समितीत आणूनच त्याची विक्री करावी, असे जाहीर आवाहन पारनेर बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अवैध दारू विक्री करणाऱ्या ७ हॉटेल्सवर पोलिसांचा छापा

- ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त
- ७ जण ताब्यात
- पोलीस पथकाची कारवाई
- आरोपींसह मुद्देमाल पारनेर पोलिसांच्या ताब्यात

पारनेर : (स. गांवकरी)



पारनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बेकायदेशीरपणे देशी व विदेशी कंपन्यांच्या दारूची विक्री करणाऱ्या हॉटेल्सवर एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. वेगवेगळ्या ७ ठिकाणी एकाच वेळी टाकलेल्या छाप्यांमध्ये पोलिसांनी एकूण ८३,४९० रुपये किमतीचा अवैध दारू साठा जप्त केला असून ७ आरोपींना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी सर्वांवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पारनेर हद्दीतील भाळवणी, टाकळी ढोकेश्वर आणि भनगडेवाडी या गावांमध्ये अवैध दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारींवरून कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी विशेष पथकासह २८ मे रोजी ही धडक मोहीम राबवली. या कारवाईत पोलिसांनी भाळवणी येथील हॉटेल साई चायनीजमधून अयज बापू भिसे याला ९,४१५ रुपयांच्या दारूसह, तर हॉटेल मदुरामधून बाबासाहेब सिताराम रोहोकले याला ८,१८५ रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले. भनगडेवाडी येथील हॉटेल समाधानवर छापा टाकून शुभम किरण रोहोकले याच्याकडून १३,४४० रुपयांची आणि हॉटेल न्यू समाधानमधून धिरज बाजीराव ठोकळ याच्याकडून १३,४३० रुपयांची अवैध दारू जप्त करण्यात आली. टाकळी ढोकेश्वर येथील हॉटेल वर्षावर कारवाई करत पोलिसांनी दिनकर आनंदा नवले याच्याकडून १७,२८५ रुपयांचा साठा पकडला. तसेच भाळवणीच्या हॉटेल रायबामधून महेश गोरख रोहोकले याला ६,१२० रुपयांच्या दारूसह आणि टाकळी ढोकेश्वरच्या हॉटेल गावकरीमधून महेश कृष्णाजी उर्फ बाबासाहेब झावरे याला १५,६१५ रुपयांच्या अवैध मुद्देमालासह अटक करण्यात आली.

पकडण्यात आलेले सर्व आरोपी आणि जप्त केलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी पारनेर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) नुसार एकूण ७ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई विनोद परदेशी, सफौ राकेश खेडकर, राजू सुद्रीक, भास्कर मिसाळ, मुकुंद दुधाळ, साईनाथ टेमकर, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, अक्षय रोहोकले, उमेश शेरकर आणि सुधीर गवारी यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

## कांदा दर घसरणीने शेतकरी संतप्त आळेफाटा येथे लिलाव बंद

आळेफाटा : (स. गांवकरी)


- २ जूनला पुणे-नाशिक महामार्गावर 'रास्ता रोको'
- उत्पादन खर्चही निघेना; गेल्या ६ महिन्यांतील विक्रीसाठी अनुदान द्या, शेतकऱ्यांची मागणी

ता. जुन्नर - कांद्याचे बाजारभाव दिवसेंदिवस कमालीचे घसरत चालल्याने संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आळेफाटा येथील कांदा लिलाव पूर्ण दिवस बंद पाडला. कांद्याला मिळणारा कवडीमोल भाव पाहता उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी सध्या प्रचंड आर्थिक कोंडीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर २ जून रोजी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर मंचर येथे भव्य 'रस्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम यांनी सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका केली. "नाशिक जिल्ह्यासाठी१५ रुपये ८० पैसे प्रति किलो दराने कांदा खरेदीचा निर्णय सोमवारी जाहीर करण्यात आला असून तोच निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू करावा," अशी मागणी त्यांनी केली. आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २ जून रोजी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर मंचर येथे 'रस्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा निकम यांनी दिला. तसेच, जे लोकप्रतिनिधी या आंदोलनात सहभागी होणार नाहीत, त्यांच्या घरासमोर कडक आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. केंद्र व राज्य सरकारने कांदा उत्पादकांना लवकरात लवकर आर्थिक अनुदान द्यावे आणि मोठ्या प्रमाणावर कांदा निर्यात खुली करावी, अशी जोरदार मागणी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

# एनएचएआयचे पीआययू कार्यालय शिर्डीला हलवू नका

**खा. नीलेश लंकेंची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी**

पारनेर : (स. गांवकरी)



राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) पीआययू अहिल्यानगर कार्यालयाचे शिर्डी येथे स्थलांतर करण्याच्या निर्णयाविरोधात खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे तीव्र आक्षेप नोंदविला असून हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी गडकरी यांची भेट घेऊन यांना सविस्तर पत्र सादर केले. अहिल्यानगर जिल्ह्याच्या प्रशासकीय, भौगोलिक आणि विकासात्मक गरजांचा विचार करण्याचे आवाहन यावेळी खा. लंके यांनी केले. एनएचएआय मुख्यालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार पीआययू अहिल्यानगर कार्यालय शिर्डी येथे हलविण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, हा निर्णय व्यवहार्य नसून त्यामुळे सुरू असलेल्या महामार्ग प्रकल्पांच्या कामकाजावर तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे खा. लंके यांनी मंत्री गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. अहिल्यानगर जिल्ह्यात एनएचएआयमार्फत अनेक महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहेत. अहिल्यानगर ते सोलापूर सीमा (एनएच-५६१ए) चारपदरीकरण, अहिल्यानगर बायपास (एनएच-६१), शहर उड्डाणपूल यांसारख्या प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या विकासाला मोठी गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या माळशेज घाट ते अहिल्यानगर बायपास तसेच खरवंडी कासार ते एनएच-२११ जंक्शन या मार्गावरील एनएच-६१ चे व्हाईट टॉपिंग आणि अहिल्यानगर ते सावळी विहीर विभागातील एनएच-१६० चे काम सुरू असून या सर्व प्रकल्पांचे नियंत्रण पीआययू अहिल्यानगर कार्यालयाकडून प्रभावीपणे केले जात आहे.

तसेच मंजूर झालेल्या नाशिक-अक्कलकोट ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेचा जवळपास ५० टक्के भाग अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातून जात असून या महत्त्वाच्या प्रकल्पाच्या देखरेखीची जबाबदारीही पीआययू अहिल्यानगर कार्यालयाकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. अहिल्यानगर हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या जिल्ह्यांपैकी एक असून जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग तसेच इतर महत्त्वाची शासकीय कार्यालये येथेच कार्यरत आहेत. महामार्ग प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या जमीन संपादन प्रक्रियेसाठी प्रशासनाशी सातत्याने समन्वय राखावा लागतो. त्यामुळे पीआययू कार्यालय अहिल्यानगरमध्येच असणे अधिक सोयीचे आणि परिणामकारक ठरत असल्याचे खा. लंके यांनी म्हटले आहे. कार्यालय शिर्डी येथे हलविल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क आणि समन्वय साधण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील नागरिक, शेतकरी, जमीनमालक आणि महामार्ग बाधित ग्रामस्थांना कार्यालयीन कामांसाठी अतिरिक्त प्रवास करावा लागून गैरसोय वाढण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः जमीन संपादन, भरपाई, सेवा रस्ते, अंडरपास, उड्डाणपूल आणि स्थानिक पातळीवरील मागण्यांबाबत नागरिकांना वारंवार पीआययू कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे कार्यालय जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या हिताचा विचार करून एनएचएआयला पीआययू कार्यालय शिर्डी येथे हलवू नये, असे निर्देश द्यावेत, अशी मागणी खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

# समाज कल्याण न्यास हिंदुस्थानात आघाडीवर

- सोन्यासारखा सोनेरी माणूस डॉक्टर सोन्या पाटील
- समाज कल्याण न्यास- संस्थापक अध्यक्ष धर्मवीर डॉ. सोन्या पाटील



(स. गांवकरी)

आजच्या स्वार्थी आणि धावपळीच्या युगात समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणारे सोन्यासारखा सोनेरी माणूस पाटील यांसारखे समाजसेवक हे खऱ्या अर्थाने समाजाचे आधारस्तंभ आहेत.

स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता गरजू, पीडित आणि वंचित घटकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहणाऱ्या अशा व्यक्ती समाजात आशेचा दीप प्रज्वलित करतात.

समाजातील शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, युवक मार्गदर्शन, गरिबांना मदत, आपत्ती काळातील सेवा अशा विविध क्षेत्रांत आपण केलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे. आपल्या अथक परिश्रमामुळे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले असून समाजात एकात्मता, बंधुभाव आणि मानवतेची भावना अधिक दृढ झाली आहे. वर्षातील 365 दिवस 24 तास दानधर्म ज्या दारातून केला जातो ते दार कोणासाठी खुले असते मला काही नको मला जे करायचे आहे ते समाजाचे कल्याण ज्या संस्थेच्या माध्यमातून मी काही देतो यापेक्षा देण्याचं भाग्य मला प्राप्त झालं हीच मला परमेश्वराने केलेली महत्त्वाची देणगी आहे मी ज्या भागात जातो ज्या घरात जातो त्या माय माऊलीचे अश्रू पुसू शकत नाही मात्र त्या माय माऊली ला बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे मी समाज कल्याण या संस्थेच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत सत्ता असून असो मला पदाची किंवा कोणत्याही सत्तेची गरज नाही कारण मंत्री खासदार आमदार जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य सरपंच ही पदके व पाच वर्षासाठी मर्यादित असतात मात्र मी ज्या संस्थेत काम करत आहे संपूर्ण राज्यात जो वटवृक्ष निर्माण केला त्या वटवृक्षाच्या सावलीखाली अनेकांना सावली देण्याचे काम मी माझ्या सगळ्यांच्या माध्यमातून करत आहेत हिंदुस्थानातील सर्वात मोठा शान दिपवाली दसरा यापेक्षाही विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी उद्याच्या आदर्श भारताचे नागरिक घडवण्यासाठी आपण काहीतरी दिले पाहिजे यासाठी शालेय साहित्य देण्याचे काम आमच्या संस्थेने केलेले आहे हे करत असताना या समूहातील प्रत्येक घटकाला प्रत्येक कार्यकर्त्याला उभारी देण्याचे काम आमच्या समाज कल्याण या संस्थेच्या माध्यमातून दादांनी केली आहे दादांच्या नावातच सर्वसामान्य जमिनीवर राहणारा माणूस ज्यावेळेस घरामध्ये जावे त्यावेळेस स्वतः घरातून काय असेल ते दुसऱ्याला देऊन टाकले जेवण करा बसा आदर तिथ्याने मान मिळवणारे समाजाचे आशास्थान समाजाचे गुरुकुल म्हणून त्या घराकडे पाहिले जाते ते घर म्हणजे अंजुर फाटा येथील डॉक्टर सोन्या पाटील मुलांनी देखील व भाऊ जेके पाटील यांनी देखील त्यांचा वारसा हाती घेऊन सामाजिक कार्य सुरू केलेले आहे अनेक वर्षांपासून भिवंडी ते शिर्डी ही पायी दिंडी येत असताना हरी नामाचा गजर शिर्डी सज लागतील ज्याचे पाय तो होईल समाधान याप्रमाणे या दिंडीमध्ये हजारो भावी भक्तांना स्थान दिले जाते कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही विशेष म्हणजे शिर्डी येथे आल्यानंतर सांगता समारंभाला आजी-माजी मंत्री खासदार यांना आमंत्रित करून बाबांचा गजर केला जातो त्यांचे बंधू साई बाबा के दिवाने जे के पाटील हे मात्र शिर्डीच्या साईबाबांचे निश्चित भक्त त्यांचे पहिले प्रेम भावावर नंतर बाबांवर त्यांनी देखील समाजकार्याचा वसाहती घेतला हा वसाहती घेतल्यानंतर संपूर्ण राज्यात समाज कल्याण ही संस्था देणारी संस्था आहे घेणारी संस्था नाही ही ओळख निर्माण केली या संस्थेला देणगी नको वर्गणी नको सोन्यासारखी माणसे सोनेरी माणसांनी जपावी असे डॉक्टर सोन्या पाटील यांचा आयुष्याचा प्रवास जर बघितला तर दुसऱ्याच्या घरात सण उत्सव झाला पाहिजे दुसऱ्याच्या घरात गोडवा निर्माण झाला पाहिजे दुसऱ्याच्या घरात दिवाळी झाली पाहिजे शिवाजी जन्माला यावा तो दुसऱ्याच्या घरात असे म्हणणारे अनेक जण असतात मात्र डॉक्टर सोन्या पाटील हे मात्र शिवाजी नव्हे तर जो कुणी माझ्याकडे येईल तो माझ्या परिवारातील एक घटक आहे या घटकाला न्याय देणे ही त्यांची महत्त्वाची भूमिका आहे त्यांचे सर्वांबरोबर संबंध सर्व राजकीय पक्षांबरोबर संबंध सर्वसामाजिक संस्थांबरोबर संबंध कुणाच्याही सुखात उभा राहणार हा 56 फुटी माणूस मात्र कुणाच्याही घरात गेल्यानंतर कोणीही दादा आमचं काहीतरी सेवन करा पण दादा मी आग्रहाने म्हणावे द्या माऊली कुणाच्या शेतामध्ये पिकलेला भात असो कोणाच्या शेतामध्ये पिकलेला वानोळा घेऊन गेल्यानंतर या माऊली तुम्ही दिलेले सुदाम याने कृष्णाला दिलेले पोहे त्याप्रमाणे तुम्ही दिलेले अनमोल वस्तू ही माझ्या करोडो रुपयांची संपत्ती आहे या संपत्ती पेक्षा मला बाकी काहीच नको असा म्हणणारा हा दादा दादा नावातच त्यांचा रुबाब एकीकडे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्यानंतर त्यांचा वारसा कोणी हाती घेतला असेल तो म्हणजे डॉक्टर सोन्या पाटील यांनी कोणती संस्था नाही कोणते आर्थिक बळ नाही जे करायचे ते निस्वार्थीपणे करायचे जे असेल ते तोंडावर बोलायचे मागे पुढे कुणाची चर्चा करायची नाही जे काही होईल ते समाजासाठी होईल माझ्यासाठी काहीच नको मला फक्त आयुष्यात धनसंपत्ती नको जनसंपत्ती महत्त्वाची असा मानणारा हा दादा आज वयाच्या अनेक वर्षांमध्ये पदार्पण करत असताना माझ्याकडे सत्काराला येत असताना कोणीही



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

येऊ नका आपल्या भागामध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य द्या उपाशी माणसाला जेवण द्या आणि ज्या ठिकाणी गरज आहे तिथेच मदत करा जिथे पिकते तिथे विकत नाही त्याप्रमाणे दादांकडे कोणीही जावे केव्हाही दार वाजवावे पण दादांनी काही नाही म्हणू नये असा दादाचा स्वभाव दादा ग्रामीण भागातील मात्र भिवंडी सारख्या शहरांमध्ये राहत असताना देखील त्याचे लक्ष नेहमी ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या सोडवण्याकडे दादा आपल्या नियमाप्रमाणे ग्रामीण भागात आदिवासी भागात वाड्या-पाड्यावर जाऊन वाडी वस्तीवर जाऊन प्रत्येकाचे विचारपूस करणार बरं आहे ना काही अडचण असेल तर मला सांगा अनेक महिलांचा तो भाऊराया लाडका भाऊ लाडकी बहीण या योजना सरकारने आता चालू केल्या पण दादांनी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू केलेली दिवाळी सुरू केलेली शालेय साहित्य या पलीकडे जाऊन दादांनी गोरगरिबांसाठी अनेक साहित्य देणे मात्र मी काय दिले याची कुठेही चर्चा करू नका मला जे देण्याचं भाग्य परमेश्वराने दिलं ते फक्त तुमच्याकडून माझं आयुष्य आरोग्यदायी घडो माझ्या परिवाराला चांगले यश मिळो हीच दादाची इच्छा असते अशा या दादाने कधीही दादागिरी केली नाही कधीही भाईगिरी केली नाही सर्व समाजामध्ये हिंदू मुस्लिम भाई भाई सिख ईसाई सर्व समाजाला घेऊन जाणारा हा दादा....... दादा ने प्रत्येकाच्या पाठीवर थाप मारावी दादा कधी पायाला स्पर्श करून देणार नाही दादा कधी दुसऱ्याच्या खिशातील पैशाकडे कधी लक्ष देणार नाही एक मात्र आल्यानंतर दोन घोट पाणी जे ताटात आहे ते काढून दुसऱ्याच्या ताटात देणारा असा हा अवलिया माणूस राजकारणात अनेकांनी ऑफर दिल्या मात्र स्वर्गीय हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची विचारप्रणाली अन्याय अत्याचार होत असेल त्या ठिकाणी खंबीरपणे उभे राहणारा वेळप्रसंगी रक्ताला रक्त देणारा हा दादा माणूस आयुष्यात संपत्ती कमवली नाही मात्र संपत्तीपेक्षा लाखो करोडो लोकांचे माय माऊलीचे आशीर्वाद मिळवले कारण ज्या संस्थेला समाज कल्याण या नाव दिले त्या समाजासाठी त्या संस्थेचे योगदान त्या संस्थेचे पदाधिकारी नेमणूक करत असताना देखील त्या समाजाने समाजासाठी जात पात धर्म न बघता सर्वांसाठी काम करावी ही त्यांची प्रेरणा त्यांच्या प्रेरणेने कॉकरोच पार्टीपेक्षा दादाची पार्टी काही मिलियन डॉलर मध्ये आहे.. दादाला जास्त सोशल मीडिया आवडत नाही दादाला स्वतःची चमकोगिरी आवडत नाही दादाला मला कोणी साहेब म्हणावे मला कोणी दादा म्हणावे यापेक्षा मला आवडीने सोन्या पाटील म्हणा असे असणारे दादा या देशाच्या राजकारणात महत्त्वाचे आहे पण राजकीय पाठिंबा नसल्यामुळे राजकीय बाळकडू नसल्यामुळे दादाने कधी दादाची जात दाखवली नाही सर्व पक्षाबरोबर मैत्रीचे संबंध सुखात नवे दुःखात उभा राहणारा दादा असा दादाला परमेश्वराने या हिंदुस्थानाचा पंतप्रधान का करू नये नरेंद्र मोदी यापेक्षा डॉक्टर सोन्या पाटील उद्या हिंदुस्थानाचा पंतप्रधान बनावा ही जनतेची अपेक्षा आहे मोदींपेक्षा डॉक्टर सोन्या पाटील यांचे कार्यप्रणाली ही संपूर्ण तरुण वर्गापासून सर्वसामान्य नागरिकांना परिचित झालेली आहे मात्र राजकारण नको समाजकारण हाच माझा धर्म हीच त्यांची क्रांती

दादा आपली सेवा ही केवळ सामाजिक कार्य नसून मानवतेची खरी पूजा आहे. अशा आपल्या कार्यामुळे समाजाला नवी दिशा, नवी ऊर्जा आणि नव्या आशा मिळत आहे. आपल्या या मोलाच्या योगदानाबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

"जो इतरांच्या आयुष्यात
आनंद निर्माण करतो,
त्याच्या आयुष्यात ईश्वर
आनंदाची उधळण करतो."
आपल्या कार्यास मानाचा मुजरा!

## थोडक्यात पण महत्वाचे



### ट्रकमधून रस्त्यावर चिखल पडल्याने अपघाताचा धोका

- विष्णू बुरे यांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला!

नवी मुंबई (स. गांवकरी) : MH 47 BL 0465 क्रमांकाचा ट्रक मानखुर्दहून वाशीच्या दिशेने जात असताना त्यामधून मोठ्या प्रमाणात चिखल रस्त्यावर सांडल्याची घटना घडली. रस्त्यावर अचानक पडलेल्या चिखलाचा अंदाज न आल्याने अनेक वाहनचालकांचा तोल जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या वाहनाचाही अपघात होता होता वाचला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विष्णू बुरे यांनी तत्काळ प्रसंगावधान राखत घटनास्थळी झाडाच्या फांद्या ठेवून वाहनचालकांना इशारा दिला. त्यामुळे पुढील संभाव्य अपघात टाळण्यास मदत झाली. तसेच त्यांनी तात्काळ 112 हेल्पलाईनवर संपर्क साधून पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सानपाडा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या. याप्रकरणी संबंधित ट्रक चालक व मालकाविरोधात सानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



### जुन्नर तालुक्यातील डॉक्टर लावणार ५५० झाडे

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ने पर्यावरणाच्या संवर्धनासाठी "एक डॉक्टर – एक वृक्ष" हे अतिशय स्तुत्य अभियान हाती घेतले असून, या मोहिमेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने गणपीर बाबाच्या डोंगरावर व परिसरात तब्बल 550 झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी लागणारी झाडे खरेदी करण्यासाठी असोसिएशनच्या वतीने नारायणगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच योगेश पाटे यांच्याकडे धनादेश सुपूर्त करण्यात आला. वाढते प्रदूषण रोखणे आणि पर्यावरणाविषयी समाजात जनजागृती करणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. हे अभियान असोसिएशनच्या सन २०२६-२०२७ च्या नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे यांच्या नेतृत्वाखाली राबवले जात आहे. वृक्ष लागवडीत चिंच ,बेल ,जांभूळ, अर्जुन ,मोहगणी, पिंपळ, आवळा ,वड ,वॉटर पल यांसारखी देशी झाडे लावली जाणार आहेत. वृक्षारोपणानंतर झाडांच्या संगोपनाची जबाबदारी नारायणगाव ग्रामपंचायतीने स्वीकारली असून पावसाळ्याच्या सुरुवातीला झाडांची लागवड केली जाणार आहे. असोसिएशनच्या अधिकृत कार्यातून आणि उपक्रमांतून नागरिकांना आरोग्य सेवा देण्यासोबतच सामाजिक बांधीवकीही उत्तमरीत्या जपली जात आहे. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे ,सचिव डॉ.प्रवीण शिंदे, चेअरमन जेटीएमपीए ट्रस्ट डॉ. प्रदीप जोशी, डॉ.संदीप काकडे, डॉ. धीरज तोडकर ,डॉ. माधुरी पाटील ,डॉ. सारिका फुलवडे ,डॉ. महादेव वाणी, डॉ.केतकी काजळे, डॉ. मयूर पांचाळ आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष डॉ.प्रशांत काचळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने वृक्ष लागवडी सारखा स्तुत्य सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचे स्वागत करत पर्यावरण संवर्धनासाठी डॉक्टरांनी पुढे येऊन सामाजिक बांधिलकी जपल्या बद्दल कौतुक केले जात आहे.

**अकोले घाटघर जलविद्युत प्रकल्पात झालेल्या अपघातानंतर मागील २१ वर्षांपासून बासनात पडलेल्या " घाटघर रोपवे" चा नव्याने विचार करण्याची गरज आहे.हा रोपवे अकोल्याचे पर्यटन क्षेत्राला नवी दिशा देणारा ठरेल. हा रोपवे झाल्यास मुंबई परिसरातून येणारे पर्यटक डोळखांब (शहापूर) येथून त्यांच्या वाहनांसह थेट घाटघरच्या कोकणकड्यावर येऊ शकतील.कोकणकडा परिसरातील सृष्टी सौंदर्यामुळे त्यांचा हा प्रवास त्यांना स्वप्नवत वाटेल.**



## प्रस्ताव पुन्हा मार्गी लावा

### पर्यटन विकासाला मिळेल नवी भरारी



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्याची चेरापुंजी अशी ओळख असणाऱ्या घाटघर परिसराला अभिजात निसर्ग सौंदर्याचे वरदान लाभले आहे. पावसाळ्यात तीन महिने घाटघरचा हा परिसर ढग धुक्यात हरवून जातो.निसर्गाचा सुंदर आविष्कार असणारा कोकण कडा,त्या पुढील दरीतून येणारे धुक्याचे लोट,टपोऱ्या थेंबांनी कोसळणारा पाऊस हे सर्वच दृश्य अदभुत असते.पावसाळ्यात हजारो पर्यटक घाटघरला भेट देतात. पावसाळ्यानंतरही येथील निसर्ग अनुभवण्यासाठी पर्यटक येतच असतात. प्रसिद्ध सांदण दरीही घाटघर जवळच आहे.

घाटघर प्रकल्पाचे काम सुरू असताना घाटघरच्या कोकणकड्याजवळ रोपवे करण्याचा प्रस्ताव होता.दोन केबिन असणाऱ्या या रोपवे च्या एका केबिन मधून माणसे तर दुसऱ्या केबिन मधून जीप, कार या सारखी वाहने आणण्याची सुविधा प्रस्तावित होती.काही कारणामुळे बारगळलेला हा रोपवे चा प्रस्ताव पुन्हा मार्गी लावण्याची गरज आहे.

मुंबई परिसरातून घाटघर भंडारदरा परिसरात येणाऱ्या पर्यटकांचे हा रोपवे खास आकर्षण ठरेल. मुंबई येथून शहापूर मार्गे डोळखांब येथे पोहचता येते.

डोळखांब येथून आपल्या वाहनांसह पर्यटक फक्त पाच मिनिटात रोपवे ने थेट कोकणकड्याच्या माथ्यावर घाटघरला येऊ शकणार होते.शिखर स्वामिनी कळसूबाई,रतनगड,निसर्गाचा अनोखा चमत्कार असणारी सांदण दरी, भंडारदरा धरण,पावसाळ्यात येथील डोंगर कड्यावरून कोसळणारे असंख्य धबधबे पाहण्यासाठी हजारो पर्यटक घाटघर भंडारदरा परिसरात येत असतात.या सर्व पर्यटकांसाठी घाटघर चा रोपवे खास आकर्षण ठरू शकेल.घाटघर परिसरात पर्यटन रोजगाराच्या संधी स्थानिक आदिवासी तरुणांना उपलब्ध होतील.ठाणे,मुंबई येथे जाण्यासाठी स्थानिकांना जवळचा मार्ग उपलब्ध होईल.अकोल्याचे पर्यटन विकासाला या रोपवे मुळे अधिक चालना मिळेल.

घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पाचे काम सुरू असताना या रोपवे चा पर्याय प्रथम पुढे आला. या प्रकल्पात तालुक्यातील घाटघर येथे प्रवरा नदीवर उर्ध्व धरण तर ठाणे जिल्ह्यातील चोंडे (शहापूर) येथे शाई नदीवर निम्न धरणाचे तसेच घाटघरच्या कोकणकड्याजवळ डोंगराच्या पोटात भुयारांतर्गत विद्युत गृहाचे काम सुरू होते.

घाटघर व चोंडे यांचे मध्ये सुमारे ४७० मीटर उंचीचा फरक आहे. घाटघर ते चोंडे अंतर सध्याच्या रस्ता मार्गे १०० किमी आहे.रोपवे मुळे हे अंतर कमी होत असल्यामुळे रोपवे चा पर्याय पुढे आला.नंतर

एका खाजगी कंपनी मार्फत या रोपवे चा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.रोपवे ला माणसांसाठी व माल वाहतुकीसाठी प्रत्येकी एक अशा दोन स्वतंत्र केबिन प्रस्तावित होत्या. माणसांच्या केबिनची क्षमता २० माणसे होती.तर मालवाहतुकीच्या केबिन मधून जीप, कार अशी छोटी वाहने नेण्याची सुविधा होती.रोपवे ची वाहन क्षमता ५ हजार किलो एव्हढी प्रस्तावित होती.या प्रकल्पाला मंजुरीही मिळाली होती.मात्र रोपवे चे काम सुरू होण्यापूर्वीच जून २ हजार ५ मध्ये कोकण कड्याची दरड कोसळून घाटघर प्रकल्पात मोठा अपघात झाला.निम्न धरणातील पाणी,तसेच कोसळलेल्या दरडीचा राडा रोडा,दगड गोटे घाटघर प्रकल्पाच्या बोगद्यात शिरले.यात बोगद्यात काम करीत असणारी काही माणसे मृत्युमुख पडली.या घटनेमुळे रोपवे चा प्रस्ताव बारगळला.

मात्र मागील २१ वर्षात घाटघर परिसरात पुन्हा दरड कोसळण्याची घटना घडलेली नाही.२००५ मध्येही तीन दिवस अतिवृष्टी होत असताना दरड कोसळली तेव्हा कड्याच्या. उतारावरील एका भागात माती मुरूम,झाड झाडोरा खडकापासून विलग होत दरीत कोसळला होता. अपवादात्मक परिस्थितीत घडलेल्या या घटनेमुळे घाटघर रोपवे वर कायमची फुली करण्याऐवजी त्याचा पुनर्विचार करणे पर्यटन वाढीच्या दृष्टीने योग्य ठरणार आहे.

## आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी झालेल्या बैठकीत आमदार कार्यकर्ते -नेत्यांमध्ये वाद



राजगुरुनगर : (स. गांवकरी)

राज्यात कांद्याच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात मिळणारा दर मात्र अत्यल्प असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी चाकण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात शेतकरी संघटना ,व सर्व राजकीय पक्षाची एकत्रितरित्या बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकत्रित भूमिका घेण्याऐवजी काही राजकीय नेते व शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्येच शाब्दिक चकमक उडाल्याने बैठकीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित शेतकऱ्यांनी या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त केली. शेतकरी गंभीर आर्थिक संकटातून जात असताना राजकीय नेत्यांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. कांद्याला हमीभाव मिळावा, बाजार हस्तक्षेप योजना प्रभावीपणे राबवावी, नाफेड व एनसीसीएफमार्फत मोठ्या प्रमाणावर खरेदी करावी तसेच शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. चाकण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शिवसेना ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर, आमदार बाबाजी काळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर बांगर, आंबेगावचे नेते देवदत्त निकम, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे, खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, शिवसेनेचे तालुका प्रमुख रामदास धनवटे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला प्रदेशउपाध्यक्ष अॅड राजमाला बुट्टे पाटी, तालुका अध्यक्ष हिरामण सातकर यांच्यासह खेड आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी, बाजार समितीचे संचालक आणि मोठ्या संख्येने कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का : प्राजक्त तनपुरे यांचा भाजपमध्ये प्रवेश!

राहुरी : (स. गांवकरी)

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाला मोठा राजकीय धक्का देत राहुरीचे माजी आमदार तथा युवा नेते प्राजक्त तनपुरे यांनी शनिवारी मुंबई येथे भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. गेल्या काही दिवसांपासून तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या काळात प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक लढवू नये, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे तसेच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांच्याशी चर्चा केली होती.



**"राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि माझे मामा जयंत पाटील यांना भेटण्याचे धाडस सध्या होत नाही. महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांनीच मला मंत्रीपदाची संधी दिली होती. त्या माध्यमातून मतदारसंघात विकासकामे करण्याचा मी प्रयत्न केला. मागील विधानसभा निवडणुकीतही मला अनेक प्रस्ताव आले होते, मात्र निष्ठेला महत्त्व देत मी राष्ट्रवादी काँग्रेसकडूनच निवडणूक लढवली होती."**

त्यांच्या विनंतीला मान देत तनपुरे यांनी भाजपला पूरक भूमिका घेतली. त्यामुळे भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचा विजय सुलभ झाला होता. दरम्यान, त्या वेळी झालेल्या चर्चेमध्ये तनपुरे यांना विधान परिषदेची उमेदवारी देण्याचा शब्द देण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यानुसार आता येत्या १ जून रोजी अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून ते उमेदवारी अर्ज दाखल करणार असून, विद्यमान राजकीय गणित लक्षात घेता त्यांच्या विजयाची शक्यता प्रबळ मानली जात आहे. मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयाबाहेर प्राजक्त तनपुरे यांच्या स्वागताचे फलक लावण्यात आले होते. प्रवेशापूर्वी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेतल्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र भाजपमध्ये प्रवेश करण्याचा त्यांचा निर्णय अंतिम असल्याचे या प्रवेशातून स्पष्ट झाले. पक्षप्रवेशानंतर बोलताना प्राजक्त तनपुरे म्हणाले, "मला माझ्या कार्यकर्त्यांचे राजकारण बघायचे आहे. कार्यकर्त्यांच्या जीवावरच मी राजकारण करत आलो आहे. वर्षानुवर्षे माझ्यासोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि मतदारसंघातील परिस्थितीचा विचार करून हा निर्णय घेतला आहे."

"माझ्या या निर्णयामध्ये जयंत पाटील यांचा कोणताही संबंध नाही. सध्याच्या राजकारणात निष्ठेला फारसे महत्त्व उरलेले दिसत नाही. यापूर्वीच्या अनेक उदाहरणांवरून जनताही अशा निर्णयांना स्वीकारत असल्याचे दिसून येते," असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, "प्राजक्त तनपुरे यांनी भारतीय जनता पक्षावर विश्वास दाखवला आहे. त्यांच्या विश्वासाला कोणताही तडा जाऊ दिला जाणार नाही. त्यांनी प्रवेशापूर्वी मांडलेल्या विकासकामांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी भाजप कटिबद्ध राहील. त्यांच्या कार्यकर्त्यांनाही पक्षामध्ये सन्मानाची वागणूक दिली जाईल."

कार्यक्रमादरम्यान माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी दोन्ही युवा नेत्यांनी गळाभेट घ्यावी, अशी मागणी केली. त्यास तत्काळ प्रतिसाद देत सुजय विखे पाटील आणि प्राजक्त तनपुरे यांनी एकमेकांना मिठी मारली. विखे आणि तनपुरे या दोन प्रभावी राजकीय घराण्यांचे वारसदार एकत्र आल्याने उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. या कार्यक्रमाला राहुरी नगरपालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, विविध गावांचे सरपंच, माजी पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी तनपुरे यांच्यासोबत त्यांच्या अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनीही भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

# महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट

- भाळवणीच्या विकृत डॉक्टरला भीमसैनिकांनी काळे फासले!
- तालुक्यात संतापाची लाट; डॉ. मंगेश बेकारसेच्या तोंडाला फासली शाई, गळ्यात घातला चपलांचा हार.



पारनेर : (स. गांवकरी)

सोशल मीडियावर महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नायक कांशीरामजी यांच्याबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन अपमानकारक व आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील डॉक्टर डॉ. मंगेश बेकारसे याच्याविरोधात संपूर्ण तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या विकृत मानसिकतेचा निषेध करत संतापलेल्या भीमसैनिकांनी संबंधित डॉक्टरच्या तोंडाला शाई फासून, त्याला चपलांचा हार घालत चांगलाच धडा शिकवला. या घटनेमुळे तालुक्यात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित डॉक्टरवर तातडीने अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भाळवणी येथील डॉक्टर डॉ. मंगेश बेकारसे याने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवरून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कांशीरामजी यांच्याविषयी अत्यंत आक्षेपार्ह आणि समाजविघातक पोस्ट शेअर केली होती. ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होताच पारनेर तालुक्यातील पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आणि भीमसैनिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला. कोट्यवधी जनतेचे आराध्य दैवत असलेल्या महापुरुषांचा अशा प्रकारे अवमान केल्याने आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या. या विकृत कृत्याचा जाब विचारण्यासाठी आणि आपला निषेध नोंदवण्यासाठी आज (दि. २९) मोठ्या संख्येने भीमसैनिक भाळवणी येथे एकत्र आले. संतप्त कार्यकर्त्यांनी महापुरुषांचा अवमान करणाऱ्या डॉ. मंगेश बेकारसे याला गाठून थेट जाब विचारला. त्यानंतर कार्यकर्त्यांच्या संतापाचा उद्रेक होऊन त्यांनी संबंधित डॉक्टरच्या तोंडावर शाई फेकली आणि गळ्यात चपलांचा हार घालून त्याचा जाहीर निषेध करत चांगलाच चोप दिला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ झाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. महापुरुषांची विटंबना करणाऱ्या अशा विकृत प्रवृत्तीवर पोलिसांनी कडक कायदेशीर कारवाई करून तात्काळ अटक करावी, अशी आग्रही मागणी आता आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून व नागरिकांमधून केली जात आहे.

# पाच महिन्यांनंतर भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून दर्शनासाठी खुले

## दररोज फक्त १,००० भाविकांना ऑनलाइन नोंदणीवर प्रवेश

पुणे : (स. गांवकरी)

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकासकामांमुळे जवळपास पाच महिन्यांपासून बंद असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर येत्या १५ जूनपासून भाविकांसाठी सकाळी ७ ते सकाळी ११ या वेळेत दर्शनासाठी खुले असणार आहे. रोज एक हजार भाविकांना दर्शन घेता येणार असून, त्यासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन मंदिर परिसरात विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. भाविकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नवीन सभामंडप उभारणीसह विविध पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत.




# अवैध घुसखोरीविरोधात 'सकल हिंदू समाजा'चा एल्गार



पारनेर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात वाढत्या अवैध घुसखोरीच्या मुद्द्यावरून वातावरण तापले असून, वडझिरे गावात या विरोधात तीव्र जनआंदोलन पुकारण्यात आले आहे. परिसरातील वाढती रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांची संख्या तसेच बांगलादेशी जिहादी वृत्तीच्या वाढत्या घटनांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि प्रशासनावर दबाव आणण्यासाठी 'सकल हिंदू समाजा'च्या वतीने उद्या, सोमवार दिनांक १ जून २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता पारनेर-बेल्ह-आळेफाटा रोडवरील देवीभोयरे फाटा येथे भव्य 'रास्ता रोको' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने या घुसखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे. या आंदोलनाला बळ देण्यासाठी आणि स्थानिक नागरिकांच्या मागण्यांना वाचा फोडण्यासाठी हिंदुत्ववादी आमदार गोपीचंद पडळकर, आमदार संग्राम जगताप आणि धर्मरक्षक सागर बेग हे मान्यवर विशेष उपस्थित राहणार आहेत. 'अवैध घुसखोरीच्या विरोधात सकल हिंदू समाज मैदानात' अशा घोषणा देत हे आंदोलन अत्यंत आक्रमक होण्याची चिन्हे आहेत.





हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,
आनंदगड शैक्षणिक संकुल
आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर
२५
गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४
पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!
(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)
DTE Code
5480
मातोश्री राधा
कॉलेज ऑफ फार्मसी
डी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM)
कालावधी २ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
बी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM & CET)
कालावधी ४ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!
- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321
ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा
धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश
मिडिअम स्कुल अँण्ड ज्युनिअर कॉलेज
के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)
अत्यल्प फी
सर्वोत्कृष्ठ शिक्षण
आपल्या पाल्याच्या
शालेय प्रवेशासाठी
संस्कारक्षम
इंग्रजी माध्यमाची
प्रयोगशील शाळा
- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670
आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज
पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved
सिव्हिल इंजिनिअरिंग 60
मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
इलेक्ट्रिकल अँण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अँण्ड मशीन लर्निंग 60
DTE Code
05662
- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686
महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अँक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -
Anandgad Virgaon
मातोश्री गंगुबाई शिंदे
अँक्यूपंक्चर कॉलेज अँण्ड हॉस्पिटल
डिप्लोमा इन अँक्युपंक्चर थेरपी (DAT)
प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी
डिप्लोमा कालावधी २ वर्षे
शैक्षणिक पात्रता इ. १२ वी पास
सुविधा
सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अँक्युपंक्चरिस्ट
अँक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
वसतिगृह सुविधा उपलब्ध
- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045
॥ सुजाता ॥ अकोले

# डॉ. सौ. प्रमिला पाटील यांना फेलोशिपअवॉर्ड घोषित

मुखेड : (स. गांवकरी)



डॉ. प्रमिला पाटील नकाते ह्या मूळ मौजे खतगांव पो. बेटमोगरा ता. मुखेड जि. नांदेड च्या आहेत. डॉ. प्रमिला याना राष्ट्रीय रामानुजन फेलोशिप अवॉर्ड नुकताच जाहीर झालाआहे. हा पुरस्कार अनुसंधान नॅशनल रिसर्च फौंडेशन (ANRF), विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST ) भारत सरकार (Govt of India) द्वारा परदेशातून येणाऱ्या भारतीय सर्वोउत्तम संशोधकांना त्यांच्या प्रभावी संशोधन प्रस्ताव साठी दिला जातो. रामानुजन फेलोशिप खूपच स्पर्धात्मक आणि सर्वमानाची असते याच स्वरूप म्हणजे ५ वर्ष साठी संशोधक देशातल्या प्रतिष्ठित अनुसंधान केंद्रा वर किंवा विभागात स्वतंत्र वैज्ञानिक म्हणून रुजू होऊ शकतो आणि त्यांना दर महा १.३५ लाख असे मानधन तथा दर वर्षी ७ लाख संशोधनासाठी खर्च, ६० हजार प्रवास साठी रक्कम दिली जाते तसेच ते पीएचडी मार्गदर्शक म्हणून संशोधक मुलांना मार्गदर्शन पण करू शकतात.

डॉ. प्रमिला यांनी २ पीएचडी पदव्या अर्जित केल्या आहेत, एक पीएचडी कोयम्बतूर विद्यापीठ तामिळनाडू तथा DRDO लॅब मधून तर दुसरी त्यांना जॉनबुक नॅशनल युनिव्हर्सिटी दक्षिण कोरिया हुन प्राप्त केली आहेत. त्यांचा संशोधनाचा विषय पर्वोस्कायट सोलर सेल्स (Perovskite Solar Cells) हा असून ह्या विषयात त्यांनी आंतराष्ट्रीय बहुतेक लेख प्रकाशित केले आहेत. त्यांना सर्वोत्कृष्ट पीएचडी थिसीस चा अवॉर्ड आणि CSIR भारत सरकार कडून रिसर्च असोसिएट फेलोशिप हा मान पण मिळाले आहेत. डॉ. प्रमिला पीएचडी नंतर कोरिया युनिव्हर्सिटी आणि HZB बर्लिन जर्मनी संशोधन केंद्र येथे पण रिसर्चर म्हणून काम केले आहे. ह्या व्यतिरिक्त त्यांची निवड हाणयांग युनिव्हर्सिटी, KIST आणि ऑक्सफर्ड (Oxford) फोटोव्होल्टाइकस Pvt Ltd कंपनी लंडन (England, UK) मध्ये पर्मनन्ट वैज्ञानिक म्हणून निवड झालेली आहे.

डॉ. प्रमिला यांनी भारतात संशोधक म्हणून कार्य करण्याचा निर्णय घेतला. त्यांना भारतात मेक इन इंडिया अंतर्गत प्रगत सोलर सेल्स बनून देशाच्या ऊर्जा संकटावर काम करायचे आहे. त्यांचे ध्येय आहे कि भारतात सर्वत्र मोफत ऊर्जा मिळाली पाहिजे आणि परदेशावर चे अवलंबन (ऑइल आणि गॅस) संपवले पाहिजे. डॉ. प्रमिला लवकरच रामानुजन फेलो म्हणून CeNSE (Centre for Nano Science and इंजिनीरिंग), IISc, बंगलोर येथे जॉईन होणार आहेत.

डॉ. प्रमिला ह्या आपल्या यशाचे प्रेरणा स्थान त्यांचे वडील री. सुभेदार मेजर श्री अशोक पाटील, सासरे श्री तुकाराम नागोराव नकाते आणि पती डॉ. उमेश तुकाराम नकाते यांना समजतात. डॉ. प्रमिला यांना युवा पिढी विशेषतः मुलींना संशोधन क्षेत्रात येण्याचे आव्हान करायचे आहे आणि देशाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्राच्या प्रगतीला मोलाचा हातभार लावण्यासाठी प्रेरणा देण्याची आहे.

# शिक्षकांना जनगणनेची बदली रजा द्या

मुंबई (स. गांवकरी)

- शिक्षक महासंघाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांची जनगणना सहसंचालकांसोबत सकारात्मक चर्चा




जनगणनेच्या कामात सहभागी झालेल्या शिक्षकांना बदली रजा मिळावी यासाठी शिक्षक महासंघ मुंबई व कोकण विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी जनगणना सहसंचालक यांची भेट घेऊन त्यांच्या समवेत चर्चा केली राज्य जनगणना कार्य संचालनालयाचे सहसंचालक संतोष पायस यांची मुंबई कार्यालयात भेट घेऊन जनगणनेत सहभागी झालेल्या शिक्षकांना बदली रजा द्यावी अशी मागणी केली यावेळी त्यांच्या समवेत शिक्षक महासंघाचे सुभाष अंभोरे विजय धनावडे व अध्यापक संघाच्या मीनल भोळे उपस्थित होते

यावेळी अनिल बोरनारे यांनी जनगणाना अधिकाऱ्यांना मे-जून 2010 मध्ये झालेल्या जनगणनेच्या कामात राज्यातील जे शिक्षक सहभागी झाले होते त्यांच्या अर्जित रजेच्या खात्यात जेवढे दिवस काम केले तेवढे दिवसांची रजा जमा करण्याबाबत तत्कालीन जनगणना संचालक तसेच शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव यांनी आदेश काढले होते दि. 29 ऑक्टोबर 2010 च्या आदेशाकडे अनिल बोरनारे यांनी जनगणना अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले व तो संदर्भ देऊन शिक्षकांना जनगणनेची बदली रजा देण्याची मागणी केली यावर जनगणना सहसंचालक यांनी जनगणना काम पूर्ण झाल्यानंतर याबाबतचा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला जाईल असे आश्वासन दिले. राज्यात 16 मे ते 14 जून जनगणनेच्या घरगणना टप्प्याला सुरुवात झाली असून या कामासाठी मोठ्या संख्येने शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित केलेल्या आहेत.

शिक्षकांना उन्हाळ्याच्या दीर्घ सुट्या असल्या तरी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक जनगणनेची कामे करीत आहे या कामी आतापर्यंत राज्यातील तीव्र उन्हाळ्यामुळे तसेच अपघातामुळे चार शिक्षक मृत्युमुखी पडले असून या शिक्षकांच्या कुटुंबीयांना 50 लाखाची मदत देऊन त्यांच्या वारसांना सरकारी नोकरी देण्यात यावी अशी मागणी राज्य शासनाकडे करणार असल्याचे केली असल्याचे अनिल बोरनारे यांनी सांगितले.




# कोळगाव सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

कोळगाव सोसायटीच्या वतीने श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कोळगाव येथील इयत्ता दहावी, बारावी, एनएमएमएस व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विद्यालयाचे प्राचार्य शहाजी हिरडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच व चेअरमन हेमंत नलगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आर. के. लगड उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष हेमंत नलगे यांनी सांगितले की, "कोळगावमधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये उल्लेखनीय प्रगती करत विद्यालयाचे नाव उंचावले आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यात उपलब्ध होणाऱ्या करिअरच्या विविध संधींचा योग्य उपयोग करून गाव, पालक आणि विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे."

# कोट्यवधींच्या विकासकामांमध्ये गैरव्यवहाराचा आरोप

पारनेर : (स. गांवकरी)

- जलजीवन मिशन, 14 वा व 15 वा वित्त आयोगातील कामांची त्रयस्थ समितीकडून चौकशी करण्याची मागणी

पारनेर तालुक्यातील मौजे धोत्रे बुद्रुक ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. जलजीवन मिशन पाणी पुरवठा योजना, 14 वा व 15 वा वित्त आयोगातील विकासकामे, शिवपानंद रस्ते, आरोग्य उपकेंद्र तसेच विविध शासकीय योजनांतील निधीचा अपहार झाल्याचा दावा समितीने केला असून, याप्रकरणी त्रयस्थ समितीमार्फत सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार, सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, धोत्रे बुद्रुक ग्रामपंचायत अंतर्गत 14 वा व 15 वा वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे. ग्रामपंचायत प्रशासन, ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमत करून निकृष्ट दर्जाची कामे करत फक्त बिले काढून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ई-टेंडर प्रक्रियेदरम्यान शासन नियमांची पायमल्ली करण्यात आली. टेंडर प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने न राबवता मनमानीपणे इतर ठिकाणाहून टेंडर मंजूर करण्यात आले.

# भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे स्वामींचे ब्रीद वाक्य जगण्यासाठी मोठा आधार - सिने अभिनेते सुशांत शेलार

**श्री स्वामी समर्थांचे दर्शन व चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार झाल्यानंतर सिने अभिनेते सुशांत शेलार**

अक्कलकोट : (स. गांवकरी)



मुंबई शहर व उपनगरांमध्ये स्वामी भक्तांच्या स्वामी भक्तीची उपासना फार मोठी आहे. घडाळाच्या काट्याप्रमाणे कधीही न थांबणारे अनेक मुंबईकर आपल्या व्यस्त जीवन शैलीतही नियमीतपणे स्वामीनाम घेण्यात कोणतीच कसर सोडत नाहीत. दैनंदीन जीवनात अनेक स्वामी भक्त माझ्या संपर्कात येतात. त्यांची स्वामी भक्ती पाहून मलाही गहिवरून येते. त्यांच्या प्रमाणे अलीकडील काही वर्षात मी ही स्वामीनामाचा जप करू लागले आहे. नियमीतपणे स्वामींचे नाम घेतल्याने प्रचंड मानसिक उर्जा लाभते. या माध्यमातून स्वामी आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे जाणवते, त्यामुळे भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हे स्वामींचे ब्रीद वाक्य जगण्यासाठी मोठा आधार असल्याचे मनोगत सिने अभिनेते सुशांत शेलार यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास सहकुटूंब भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी सिने अभिनेते सुशांत शेलार यांचा सहकुटुंब श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सिने अभिनेते सुशांत शेलार बोलत होते. पुढे बोलताना सिने अभिनेते सुशांत शेलार यांनी श्री स्वामी समर्थांनी आपल्या अगाध लिलांच्या माध्यमातून तहयात भाविक जनतेसाठी अनेक चमत्कार केल्याने स्वामींचा भाविक वर्ग मोठा आहे. "हम गया नही जिंदा है" या ब्रीदवाक्यामुळे श्री स्वामी समर्थांचे

मुळस्थान असलेल्या येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात स्वामींच्या जागृततेची व त्यांच्या अस्तित्वाची प्रचिती आजही अनेक भाविकांना येत आहे, त्यामुळे सुज्ञ नागरीक हे स्वामी भक्तीत व स्वामी सेवेत जीवन गुंतवून स्वामी कृपेची सावली आपल्या कुटूंबावर घेत आपल्या कुळांचा उद्धार करून घेत आहेत. श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात येणाऱ्या भाविकांसाठी मंदीर समितीच्या वतीने समितीचे प्रमुख महेश इंगळे हे तेवढ्याच तन्मयतेने व नम्रतेने स्वामी भक्तांची सेवा करीत सुलभ दर्शन व्यवस्थेसह देवस्थान समितीच्या माध्यमातून विविध समाज उपयोगी धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून स्वामी भक्तांच्या दातृत्वाचे पुण्य फळाला आणले आहे, यानिमीत्ताने त्यांच्या सेवेप्रती महेश इंगळे यांच्या चरणी ही माझे साष्टांग नमन असून मंदीर समितीच्या उपक्रमास व इंगळे कुटूंबियाच्या स्वामी सेवेस माझ्या शुभेच्छा असल्याचे मनोगत व्यक्त केले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करावी

नायगाव (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षणापासून वंचित राहिलेल्या जातींना न्याय मिळवून द्यावा, अशा मागणीचे निवेदन शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत बालाजी खतगावकर यांचे, स्वीय सचिव ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात अनुसूचित जातींना शिक्षण व नोकरीमध्ये १३ टक्के आरक्षण असून या प्रवर्गात ५९ जातींचा समावेश आहे. मात्र, आरक्षणाचा लाभ केवळ काही मोजक्याच जातींना मोठ्या प्रमाणात मिळत असून सुमारे ५७ जाती या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पंजाब, आंध्रप्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, हरियाणा व कर्नाटक या राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रात काही लोक सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात वक्तव्य करून संभ्रम निर्माण करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

## पल्लवी हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी



नवीन नांदेड (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र संकुलातील संशोधक विद्यार्थिनी पल्लवी देवराव हंबर्डे यांना भौतिकशास्त्र विषयात नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. पल्लवी हंबर्डे यांनी "मोलुक्युलर इंटरॲक्शन्स ॲन्ड रिलॅक्सेशन स्टडीज ऑफ ॲसीटेट युजिंग ब्रॉडबँड डायलेक्ट्रिक स्पेक्ट्रोस्कोपी" या विषयावर भौतिकशास्त्र संकुलातील प्रो. डॉ. अशोक कुंभारखाणे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आपला संशोधन प्रबंध सादर केला होता. दि.२५ मे २०२६ रोजी त्यांची मौखिकी परीक्षा यशस्वीरित्या पार पडली असून त्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली. या संशोधन कार्यात डॉ. नितीन गरड, डॉ. प्रमोद कोणमारे, डॉ. शिल्पा पतंगे, डॉ. पूजा खानझोडे, गीतांजली जाधव तसेच राजेश पतंगे यांनी मोलाचे सहकार्य केले. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, डॉ.अशोक महाजन, कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील, संकुलाचे संचालक डॉ.राजाराम माने यांच्यासह नंदकुमार हंबर्डे,राजेश मोरे, आकाश हंबर्डे, विकास हंबर्डे व संध्या हंबर्डे आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जी.एम.शिंदे प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त



नवीन नांदेड (स. गांवकरी) : इंदिरा गांधी हायस्कूल सिडकोचे मुख्याध्यापक जी.एम.शिंदे हे प्रदीर्घ सेवेनंतर 31 मे 2026 रोजी नियत वयोमाना नुसार मुख्याध्यापक या पदावरून 31 मे 26 रोजी 32 वर्षांचा प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. 9 ऑगसष्ट 94 रोजी शारदा भवन शिक्षण संस्था संचलित इंदिरा गांधी हायस्कूल सिडको येथे सहशिक्षक म्हणून नियुक्ती झाली,सेवा काळात 18 महिने नांदेड येथील महात्मा फुले बाबानगर येथे 18 महिने पर्यवेक्षक तर उपमुख्याध्यापक म्हणून दोन वर्ष इंदिरा गांधी हायस्कूल सिडको येथे कार्यरत होते,सेवा काळात शाळेतील गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न विज्ञान विषयाचे अध्यापन, शाळेतील परिसरात वृक्षारोपण,व जलसंधारण फेरी व्दारे पाण्याचे महत्व व पाण्याचे जतन करण्यासाठी प्रबोधन केले आहे, सेवा काळात शेवटच्या दोन वर्षांचा काळात मुख्याध्यापक म्हणून पदभार घेऊन शालांत परीक्षा गुणवत्ता वाढीसाठी विशेष अभ्यासक्रम घेऊन गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले आहे.

# अर्धापुरात कायद्याचे रक्षकच बनले भक्षक

## शेतात हळदीसाठी बेड मारीत असताना महिलेला मारहाण, विनयभंग

**पोलीस कर्मचाऱ्यासह चौघांविरुद्ध गुन्हा**

अर्धापूर : (स. गांवकरी)



तालुक्यातील मालेगाव येथे शेतात हाळदीचे ट्रॅक्टरने बेड मारीत असताना एका पोलीस कर्मचाऱ्यासह चौघांनी मिळून महिला फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबियांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घडली आहे. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींनी मी पोलीस आहे माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही अशी धमकी दिली आहे.

पोलीस सुत्रानकडुन मिळालेल्या माहितीनुसार मालेगाव येथील गट क्रमांक १५७ मध्ये फिर्यादी महीला यांच्या सास-याच्या शेतात हळदीचे बेड तयार करण्याचे काम सुरू होते. यावेळी आरोपी रेवन उर्फ अर्जुन सिद्धेश्वर स्वामी हिंगोली जिल्ह्यातील एका पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत आहे), रघुनाथ सिद्धेश्वर स्वामी, सिद्धेश्वर नागनाथ स्वामी व एक महिला यांनी ट्रॅक्टर अडवून काम बंद पाडले. आरोपींनी फिर्यादी महिलेस अश्लील शिवीगाळ करत आरोपी रेवन स्वामी याने फिर्यादीचा हात धरून ओढणी ओढली आणि जमिनीवर पाडून त्यांचा विनयभंग केला. त्यानंतर रघुनाथ स्वामी याने फिर्यादी महिलेचा विनयभंग केला.

भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या पतीला आरोपी रघुनाथने हातातील कड्याने तोंडावर व मानेवर मारहाण केली ज्यामुळे त्यांचा एक दात पडला असून ते गंभीर जखमी झाले आहेत. आरोपींनी फिर्यादीचे दीर आणि सासू यांनाही लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली.

घटनेच्या वेळी आरोपी पोलीस कर्मचारी रेवन स्वामी याने स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करत मी पोलीस आहे माझे कोणी वाकडे करू शकत नाही तुला खोट्या केसमध्ये अडकवतो अशी उघड धमकी दिली. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार हट्टा पोलीस ठाणे रेवन उर्फ अर्जुन सिद्धेश्वर स्वामी, रघुनाथ सिध्देश्वर स्वामी,सिध्देश्वर नागनाथ स्वामी व एका महिले विरूद्ध भा.न्या.सं. (बिएनएस) च्या कलम ३२९(३), १२६(२), २९६, ११५(२), ७४, ११७(२), ३५१(२), ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम,सपोनि.विष्णुपंत कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास जमादार बालाजी चाटे हे करत आहेत.

# मतदार यादी प्रकरणी होटाळकरांचे नाव समाविष्ट करा

नायगाव : (स. गांवकरी)

नायगाव तालुक्यातील व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मतदार यादीवरून निर्माण झालेला वाद आता अधिकच गडद झाला असून, होटाळा (ता. नायगाव) येथील सेवा सहकारी संस्थेचे प्रतिनिधी तथा माजी संचालक शिवराज पाटील होटाळकर यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. विभागीय सहनिबंधक (लातूर) तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आदेश देत निवडणूक यंत्रणेलाच अप्रत्यक्षपणे चपराक लगावल्याची चर्चा सहकार वर्तुळात रंगू लागली आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र, संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून वैध नियुक्ती असतानाही शिवराज पाटील होटाळकर यांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. या प्रकारामुळे सहकार क्षेत्रात संतापाची लाट उसळली होती. संबंधित निर्णयाविरोधात होटाळकर यांनी अधिकृत हरकती नोंदवत आवश्यक पुरावे आणि कागदपत्रे निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर केली होती. या प्रकरणाची सुनावणी महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अंतर्गत घेण्यात आली. सुनावणीनंतर विभागीय सहनिबंधकांनी होटाळकर यांची नियुक्ती वैध असल्याचे स्पष्ट मान्य करत त्यांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आदेश निवडणूक यंत्रणेला दिले आहेत. या आदेशामुळे निवडणूक प्रक्रियेत झालेल्या कथित त्रुटींवर शिक्कामोर्तब झाल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, संस्थेच्या ठरावानुसार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झालेली असतानाही संबंधितांचे नाव गायब होणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

# लिपीक दता काकडे प्रदिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित कुसुमताई प्राथमिक शाळा सिडको नवीन नांदेडचे लिपीक दता गोविंद काकडे हे 32 वर्षांचा प्रदीर्घ सेवेनंतर 31 मे 26 रोजी नियमित वयोमाना नुसार सेवानिवृत्त होत असुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने सपत्नीक सत्कार आयोजित करण्यात आले आहे. कुसूमताई प्राथमिक शाळा सिडकोत दता गोविंदराव काकडे हे 1/9/93 रोजी लिपीक या पदावर रूजू झाले असून 32 वर्ष 9 महिन्याचा सेवा काळात शाळेत शालैय अभिलेखे, शाळेचे प्रगती,संचालक मंडळ सह शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्ये वेळोवेळी सहकार्य मिळाल्याने सेवा काळात उत्कृष्ट कार्य करणाची संधी मिळाली असल्याचे असल्याचे सांगून संस्था सचिव संभाजी बिरादार, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शशीकलाताई बिरादार, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका उषाताई कारामुंगे यांच्या सहकार्याने सेवा काळ चांगला गेला असल्याचे सांगितले. 30 मे रोजी26 रोजी सकाळी 9 वाजता शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने नवीन कौठा नांदेड येथील आकृती हॉटेल येथे सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्नीक सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

# मोबदला व पुनर्वसनासाठी बाधितांचा घेराव

ठाणे : (स. गांवकरी)



दिवा पूर्व व पश्चिम उड्डाणपूलाच्या सार्वजनिक प्रकल्पासाठी जमीन संपादन करताना योग्य मोबदला व पुनर्वसन न झाल्यास बाधित राहिवाशी आंदोलन करू व जमीन आमच्या हक्काची.... अश्या घोषणा देत आज दिवा पश्चिमेस भू संपादन करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना बाधितांनी घेराव घातला. भू संपादन कायदा 2013 नुसार जमीन संपादन प्रक्रियेत पारदर्शकता आणी बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अनिर्वाय असताना आम्हाला कुठल्याही प्रकारे विश्वासात न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांचे भू संपादन प्रक्रिया सुरु केली असल्याचा ठपका ठेवत दिवा पश्चिम येथे अधिकाऱ्यांनी काम सुरु केले आहे. दिवा रेल्वे स्टेशन येथील पूर्व पश्चिम मार्ग जोडणारा जो उड्डाणं पूल रेल्वेच्या हद्दीत पर्यंत पुर्ण तयार झाला आहे पुढे तो प्रशासन आणी ठाणे महानगरपालिकेच्या अखात्यारीत येतो तो उड्डाणं पूल जिथे ऊतरणार आहे त्या जागेत राहणाऱ्या रहिवाशांवर अन्याय केला जात असल्याचे बाधितांच्या जमावाने स्पष्ट केले. सदर पुलासाठी लागणाऱ्या जागेचे भू संपादन योग्य रित्या केले जात नाही व जमिनीच्या मालकांना त्यांच्या जागेची कवडीमोल भाव मिळकत मिळत आहे, भूसंपादन करायला येताना आम्हाला विश्वासात न घेता भूसंपादन करत आहेत तर अधिकृत जागेचा सर्वे, आमच्या पत्राची योग्य ती उत्तर मिळत नाही जबरदस्तीने भूसंपादन चालू आहे नाही अशा तेथील राहिवाशांचा आरोप आहे, भू संपादनाचे पैसे आताच्या बाजार भावाप्रमाणे द्यावेत आणी तेथील बाधित रहिवाशांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करावे अशी त्यांची प्रमुख मागणी केली आहे. ठाणे जिल्हा अधिकारी कार्यलयातील अधिकाऱ्यांबरोबर चर्चा, आपल्या मागण्या त्यांच्या समोर मांडल्यावर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर या पुढचे आमचे आंदोलन तीव्र असेल असे या वेळी तेथील रहिवाशांनी सांगितले. सदर प्रसंगी प्रकल्प ग्रस्त बाधित रहिवासी विशाल एकनाथ भगत, करण रमेश पाटील, सुभाष सिताराम म्हात्रे, ज्ञानेश्वर रामभाऊ म्हात्रे, संतोष जीवन म्हात्रे, अभिषेक ठाकूर, निलेश मनोहर म्हात्रे, अजित एकनाथ भगत, निलेश एकनाथ भगत, मनुभाई सिताराम मोरे, वेनुबाई विष्णू पाटील आदी गावकरी सदर प्रसंगी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करा - दर्शना म्हात्रे, नगरसेविका

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका तर्फे पावसाळ्यापूर्वी शहरातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत. याच पार्श्वभूमीवर संबंधित प्रभागातील लोकप्रतिनिधींनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. दिवा प्रभाग क्र २८ मधील म्हसोबादेव नगर परिसर, लो प्राईज बेडेकर नगर, चिन्मय परिसर तसेच बेडेकर मुख्य नाला येथे भेट देत सुरू असलेल्या नालेसफाई कामांचा आढावा घेण्यात आला. संबंधित परिसर सखल भागात येत असल्यामुळे पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल अशा पद्धतीने कामे करण्याच्या सूचना नगरसेविका दर्शना चरनदास म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहे. तसेच नाल्यातील गाळ व कचरा तात्काळ उचलून परिसर स्वच्छ ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. पावसाळ्यापूर्वी सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. यावेळी घनकचरा व्यवस्थापन अधिकारी डोंगर परदेशी, कार्यकारी अभियंता अविनाश वसावे, विभागप्रमुख चरणदास म्हात्रे, एस.आय. गणेश चव्हाण तसेच करण म्हात्रे आदी उपस्थित होते.



### आरोपींना अटक न झाल्याने आमरण उपोषणाचा इशारा

पारनेर (स. गांवकरी) : माजमपुर (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) : मौजे माजमपुर येथील कै. सुदाम विष्णु आढाव यांनी जमीनीच्या वादातून शेतात विषारी औषध प्राशन करून केलेल्या आत्महत्येप्रकरणी आरोपींना अद्याप अटक न झाल्याने त्यांचे पुत्र प्रभाकर सुदाम आढाव यांनी आमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. प्रभाकर आढाव यांनी दिलेल्या निवेदनानुसार, गट नंबर ६२ मधील शेतीच्या वादात आरोपी संभाजी फक्कड आढाव, राजाराम फक्कड आढाव, शिवाजी फक्कड आढाव व भाऊसाहेब सोपान आढाव यांच्या सततच्या जाचाला कंटाळून कै. सुदाम विष्णु आढाव यांनी दि. २१ मे २०२६ रोजी शेतात विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पारनेर पोलिस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र. ३८७/२०२६ नोंदविण्यात आली आहे. मात्र, तब्बल आठ दिवस उलटूनही कोणत्याही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. प्रभाकर आढाव म्हणाले, "दि. ३१ मे २०२६ पर्यंत आरोपींना अटक झाली नाही तर दि. १ जून २०२६ पासून पारनेर पोलिस स्टेशन येथे मी व माझे कुटुंबीय आमरण उपोषणास बसणार आहोत." उपोषणादरम्यान कुटुंबीयांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या संदर्भात पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांना निवेदन देण्यात आले आहे. प्रभाकर आढाव यांनी पोलिस प्रशासनाकडे तातडीने आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे.

### राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेचे श्री शंभुकलश काव्यकरंडक स्पर्धा व दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन २०२६ अहिल्यानगर येथे दि.३१ मे २०२६ रोजी पार पडणार असून,या संमेलनासाठी उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक डॉ श्री अनंत कराड, संमेलनाध्यक्ष श्री नितीन चंदनशिवे (दंगलकार), स्वागताध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते श्री सुनिल शिंदे सर, तसेच प्रमुख पाहुणे,ज्येष्ठ साहित्यिक श्री सुनील गोसावी,चित्रपट दिग्दर्शक,गितकार श्री अनिलकुमार बा होळकर,जेष्ट साहित्यिक डॉ कैलास दौंड,प्रा.सुरेश वाळेकर लाभले आहेत. संस्थेचे अध्यक्ष कवी महादेव लांडगे ,उपाध्यक्ष कवी बाळासाहेब घोरपडे,संस्थेचे संघटक कवी विश्वेश्वर बोडखे,प्रसिद्धी प्रमुख पत्रकार अक्षय विधाते,या सर्वांच्या उपस्थितीत संस्थेचे दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन भव्य स्वरुपात पार पडणार असून संमेलनाचे ठिकाण माऊली सांस्कृतिक भवन टिळक रोड हॉटेल नंदनवन जवळ, अहिल्यानगर,येथे असून श्रीशंभुकलशांचा साहित्याचा वारसा जपताना मायमराठीच्या सेवेसाठी सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी या भव्य राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन केले आहे असे कार्याध्यक्ष अनिकेत अवसरमल तसेच युवा कवी व संस्थेचे संस्थापक सचिव श्री संदिप पाचारणे यांनी सांगितले आहे.

### नगर शहरातील गोळीबार- हल्ल्यात दोन अल्पवयीन मुलांचा सहभाग



अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्ता परिसरात रविवारी (२४ मे) सकाळी व्यावसायिक चिरंजीव दत्तात्रय गाढवे (वय ३१, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) यांच्यावर झालेल्या हल्ला व हवेत गोळीबार प्रकरणात तोफखाना पोलिसांनी भिंगार परिसरातील दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. त्यांनी आणखी दोन साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. मात्र, उर्वरित दोन संशयित आरोपी अद्याप पसार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. दरम्यान, ताब्यात घेतलेल्या अल्पवयीनांकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली असून, त्यांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. गाढवे यांची एमआयडीसी निंबळक बायपास परिसरात कंपनी असून, ते २४ मे रोजी सकाळी मित्रासोबत चहा-नाश्त्यासाठी बाहेर गेले होते. पाईपलाईन रस्त्यावरील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी चहा या दुकानात ते थांबले असताना अचानक तीन ते चार जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर हल्ला केला. यातील एका हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्यांच्या पाठीवर वार केला. त्यानंतर दुकानात घुसून मारहाण करण्यात आली. हल्ल्यानंतर संशयितांनी पळ काढताना हवेत गोळीबार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### तरूणीचे अपहरण; गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तालुक्यातील चास येथील कॉलेज परिसरातून एका तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने पळवून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द बुधवारी (२७ मे) दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित तरूणीच्या वडिलांनी (वय ४५) फिर्याद दिली आहे. त्यानुसार शुभम दीपक काकडे, दीपक काकडे, ऋषीकेश दीपक काकडे (सर्व रा. कोंभळी, ता. कर्जत) व शुभम चितळकर (पूर्ण नाव माहिती नाही, रा. साकत, ता. अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राजेंद्र नागवडे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी

## कार्यकर्त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा पवार गटाकडे मागणी

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यात गेल्या पन्नास वर्षांपासून नागवडे कुटुंबाने समाजसेवेचे व्रत जोपासत तालुक्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. सहकार व शिक्षण महर्षी स्वर्गीय शिवाजीराव नागवडे (बापू) यांनी सहकार चळवळीची पायाभरणी करून श्रीगोंदा तालुक्याच्या विकासाला गती दिली. सहकारी साखर कारखाना, शैक्षणिक संस्था तसेच घोड-कुकडी सिंचन प्रकल्पामुळे तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीला चालना मिळाली, असे कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. स्वर्गीय शिवाजीराव नागवडे यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून त्यांचे पुत्र राजेंद्र दादा नागवडे यांनी सहकाराचा वारसा सक्षमपणे पुढे नेला आहे. सहकारी साखर कारखान्याचे प्रशासन काटेकोरपणे सांभाळत त्यांनी गाळप हंगामाचे योग्य नियोजन केले. तसेच ऊस उत्पादकांना वेळेत बिले देणारा जिल्ह्यातील अग्रगण्य कारखाना म्हणून नागवडे कारखान्याची ओळख निर्माण केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राजेंद्र दादा नागवडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून श्रीगोंदा तालुक्यात शेतकरी, कामगार, कष्टकरी व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. घोड-कुकडी सिंचन व्यवस्थेसह तालुक्यातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले असले, तरी त्यांनी खचून न जाता जनसेवा सुरू ठेवली, ही बाब उल्लेखनीय असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. साखर उद्योग अडचणीत असतानाही राजेंद्र दादा नागवडे यांनी सहकार महर्षी नागवडे साखर कारखाना सक्षमपणे चालवत ऊस उत्पादकांना जिल्ह्यात सर्वाधिक व वेळेत ऊसदर दिला. आसपास खाजगी साखर कारखान्यांचे जाळे असतानाही त्यांनी उत्तम प्रशासन व नियोजनाच्या बळावर कारखाना यशस्वीपणे चालवला असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सर्व कार्याचा विचार करून राजेंद्र दादा नागवडे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) यांच्याकडे कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर संदीपराव औटी, सुभाषराव शिंदे, विश्वनाथ गिरमकर, श्रीनिवास घाडगे, एकनाथराव आळेकर, राकेश पाचपुते, प्रशांत दरेकर, योगेश भोईटे, मारुती पाचपुते, दत्तात्रय काकडे, भाऊसाहेब नेटके, बंडू जगताप, प्रा. सुरेश रसाळ, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, शरद जगताप, हेमंत नलगे, सुरेश खरात, बाळासाहेब लगड, किसन कोल्हटकर, धनंजय घाडगे, भरत नलगे, रामदास लबडे, सरपंच प्रमोद शिंदे, दादासाहेब कुरुमकर, लक्ष्मण भोईटे, विश्वनाथ बोरुडे आदी कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## कृषि विभागाची धडक कारवाई

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नायगांव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी, प्रसिद्ध झालेल्या बातम्या व तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी नायगांव तालुक्यातील सात कृषि सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करुन त्यांचे खत परवाने सहा महिन्यासाठी निलंबीत केले आहेत.

सात कृषी निविष्ठा केंद्रांचे नावे पुढीलप्रमाणे (दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा केंद्र, वसंत अग्रो सरि्वस सेंटर, गजानन कृषी सेवा केंद्र, हनुमान कृषी सेवा केंद्र, मातोश्री ॲग्रो एजन्सी, शिवकृपा कृषी सेवा केंद्र, नायगांव) तसेच मे.वर्षा ॲग्रो ट्रेडर्स, खांबाळा ता.मुदखेड, मे.व्यंकटरमणा कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार, मे.तिरुमला कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार केंद्राचे सुनावणीअंती निदर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने परवाने निलंबीत केले आहेत.

## अन्न व औषध प्रशासनाच्या मोहीमेत संशयित अन्नपदार्थ साठा जप्त

नाशिक : (स. गांवकरी)

नागरिकांना दर्जेदार व सकस अन्न पदार्थ मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशानाने तपासणी मोहीम सुरू केली आहे. 27 मे 2026 रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी केलेल्या तपासणीत आढळेलेल्या संशायस्पद अन्न पदार्थांचा रूपये 1 लाख 19 हजार 712 साठा जप्त करण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन, सह आयुक्त दि.ज्ञा. तांबोळी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

जेलरोड, नाशिकरोड येथील मे. अजनी ट्रेडर्स या पेढीची तपासणी केली असता पेढी विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले. या पेढीत विक्रीसाठी आढळलेले Cafenated Beverage (Sting) व एनर्जी ड्रिंक या दोन अन्न पदार्थांचे नमुने घेवून उर्वरित रूपय 31 हजार 680 किंमतीचे 1 हजार 584 बाटल्या भेसळीच्या संशयावरून अन्न व औषध प्रशासनामार्फत जप्त करून सुरक्षित ठेवण्यात आला आहे. पंचवटी, मार्केट यार्ड या ठिकाणी मे. नेहा फुड प्रॉडक्टस् या पेढीच्या तपासणीतही विनापरवाना विक्री होत असल्याचे निदर्शनास आले.

पेढीत विक्रीसाठी मैदा पापड व स्नॅक्स या दोन अन्न पदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेवून उर्वरित रूपये 13 हजार 568 किंमतीचा 336 किलोग्रॅम साठा भेसळीच्या संशयावरून अन्न व औषध प्रशासनामार्फत जप्त करून सुरक्षित ठेवण्यात आला आहे मे.बालाजी ट्रेडिंग कंपनी, त्र्यंबकेश्वर, नाशिक या पेढीच्या तपासणीत या पेढीत विक्रीसाठी असेलेले रिफाइंड सोयाबीन ऑइल हे खुल्या स्वरूपात विक्री होत असल्याचे आढळले, या तेलाचे नमुने तपासणीसाठी घेवून रूपये 68 हजार 864 किंमतीचा 430 किलोग्रॅमचा साठा जप्त करून सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

## पाथर्डी मनसेच्या पदाधिकारी नियुक्त्या जाहीर

पाथर्डी : (स. गांवकरी)



तालुक्यातील मनसे पदाधिकारी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशान्वये व संपर्क अध्यक्ष नयन कदम यांच्या सूचनेनुसार उपजिल्हाध्यक्षपदी मोहरी येथील देविदास हंडाळ, उपतालुकाध्यक्षपदी सोमठाणे येथील रामेश्वर काकडे, आल्हणवाडी येथील विनोद गव्हाणे, शिरसाटवाडी येथील एकनाथ सानप यांची निवड मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी नियुक्तीपत्र देत केली. तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संघटन बळकट करून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका लढवण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी दिल्या. तालुक्यात विरोधी पक्षच उरला नसून सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे, परंतु मनसे सक्षम पर्याय म्हणून जनतेसमोर उभा राहणार असून येत्या काळात ग्रामपंचायती पासून सर्व निवडणुका संघटना बांधणी करून लढणार असल्याचा निर्धार पालवे यांनी व्यक्त केला. तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे पक्षात स्वागत करत जोमाने काम करा. जिथे मदत लागेल तिथे जिल्हाध्यक्ष व मी नेहमी आपल्या सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला. पक्ष बांधणीसाठी लवकरच गाव तिथे शाखा उपक्रम राबवणार असल्याचेही तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी म्हटले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम जोमाने करणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या बैठकीस मनसे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, महिला सेना तालुकाध्यक्ष रेणुका फुलशेटे, शहराध्यक्ष संदीप काकडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण शिरसाट, अमोल नरोटे, अक्षय ऊराडे, तुषार शिरसाट, संजय बन, रशीद शेख, विकास डाळ, शंकर डोईफोडे, अनिल डोईफोडे, संदीप हंडाळ, मनोज ठोंबरे, निसार पठाण, विशाल भापकर, बंटी मोरे, प्रशांत भापकर, कानिफ हंडाळ, वैभव भापकर, सचिन पालवे, महेश ऊराडे, अंबादास शेळके, तोफिक मणियार, आलम पठाण, भाऊसाहेब बन, गणेश डोईफोडे यांसह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक हजर होते.

## सुरक्षा रक्षकाचे समाजसेवेचे कार्य : वाबळे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- "रात्री सुरक्षा रक्षक, दिवसा समाजसेवक : सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट प्रदान बददलच्या नॅशनल एक्सेर्विसेमन सिक्युरिटी गार्डवतीने सन्मान



समाजकार्य व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सुनिल भिमराव सकट यांना पीएचडी मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाउंडेशनतर्फे मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून गौरविण्यात आल्या बद्दल नॅशनल एक्सेर्विसेमन सिक्युरिटी गार्डच्या वतीनेही सुनिल सकट यांचा विशेष सत्कार नॅशनल एक्सेर्विसेमन सिक्युरिटी गार्ड संस्थेचे संचालक मनसुख पाटीलराव वाबळे यांनी त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक केले. मनसुख वाबळे म्हणाले, "सुनिल सकट हे आमच्या संस्थेमध्ये सुरक्षा कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. रात्री सुरक्षा रक्षक म्हणून काम करत असताना ते आपल्या उत्पन्नातील काही हिस्सा गोरगरिबांना मदत करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी खर्च करतात. त्यांचे कार्य अत्यंत प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे." यावेळी सुनिल सकट यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "मला मिळालेला सन्मान हा माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील गरजू लोकांना मदत करणे आणि पर्यावरण जपणे हे माझे कर्तव्य समजून मी कार्य करत आहे. माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व मान्यवरांचे मी मनःपूर्वक आभार मानतो." समाजसेवा आणि पर्यावरण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासन तसेच विविध निमशासकीय संस्थांकडूनही त्यांना अनेक सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांची एमईसीएलसाठी निवड

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मिनरल एक्सप्लोरेशन अँड कन्सल्टन्सी लिमिटेड (एमईसीएल), नागपूर यांच्यासोबत केलेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. ऑगस्ट, २०२५ मध्ये झालेल्या या करारानंतर विद्यापीठाच्या भूशास्त्र संकुलातील एम.एस्सी. भूगर्भशास्त्र शाखेच्या पाच विद्यार्थ्यांची एमईसीएल, नागपूर येथे प्रतिष्ठित इंटर्नशिपसाठी निवड झाली असून त्यांना वार्षिक ३ लाख रुपये मानधन मिळणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सिद्धार्थ शिरसाठे, शरन्या ठवकर, अमित लोहारे, यशवंत चव्हाण आणि राहुल गायकवाड यांचा समावेश आहे. ही निवड विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातील सशक्त सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरत असून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी तसेच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.

## पाण्यात बुडून एमबीएच्या ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



एमबीएच्या ३ विद्यार्थ्यांचा तलावात बुडून मृत्यू झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील चंद्रपूर गावात ही घटना घडली. या घटनेमुळे अहिल्यानगरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली आहे. पोलिसांनी देखील घटनास्थळी धाव घेतली असून तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, साठवण तलावात बुडून ३ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील चंद्रपूर गावात ही घटना घडली. हे तिन्ही तरुण एमबीएचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. साठवण तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही पाण्यात बुडाले. स्थानिक त्यांच्या मदतीसाठी धावले पण त्यांना तिघांना वाचवण्यात अपयश आले. २४ वर्षीय अभिषेक गंगाधर जाधव, २३ वर्षीय प्रवीण प्रभाकर रसाळ आणि २६ वर्षीय महेश अशोक शिंदे या तीन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिघांचे मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहेत. लोणी पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू आहे. दरम्यान, पुण्या जवळच्या पानशेत धरणाच्या कालव्यामध्ये बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला. पाण्याचा अंदाज न आल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आळी आहे.

# पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा अखंड पुरवठा

## नागरिकांना घाबरून अतिरिक्त खरेदी न करण्याचे आवाहन

मुंबई : (स. गांवकरी)




देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ होत असतानाही इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसी) पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा सुनिश्चित करत असल्याची माहिती कंपनीने दिली आहे. वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर कंपनीने आपल्या पुरवठा साखळी, वाहतूक व्यवस्था आणि वितरण यंत्रणा अधिक सक्षम करत देशभरात इंधन उपलब्धता कायम ठेवली आहे.

आयओसीच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात 1 ते 28 मे 2026 या कालावधीत डिझेलच्या विक्रीत मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल 31.5 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विक्रीत मोठी वाढ झाली असून बीडमध्ये 67.3 टक्के, अहमदनगरमध्ये 61.2 टक्के, सांगलीमध्ये 53 टक्के, उस्मानाबादमध्ये 52.7 टक्के, अकोला आणि नांदेडमध्ये प्रत्येकी 51.6 टक्के वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातही डिझेल विक्रीत 20.1 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या मते, ग्रामीण भागातील हंगामी नांगरणी, कापणी आणि कृषी कामांमुळे इंधनाची मागणी वाढली आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्रेत्यांच्या तुलनेत इतर पुरवठादारांच्या किंमतींमधील फरकामुळे ग्राहकांचा कल आयओसीच्या इंधन केंद्रांकडे वाढला आहे. याशिवाय, अनेक संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांनी रिटेल इंधन केंद्रांकडे वळल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे. इंडियनऑइलने आपल्या देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्रकल्प आणि रिटेल इंधन केंद्रांच्या विस्तृत नेटवर्कच्या माध्यमातून पुरवठा अखंड ठेवला आहे. कंपनीची पुरवठा पथके, वाहतूक व्यवस्था, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल केंद्रे चोवीस तास कार्यरत असून उत्पादनांची वेळेवर वाहतूक आणि पुनर्भरण सुनिश्चित केले जात आहे. तसेच राज्य प्रशासनाशी समन्वय साधून पुरवठा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यात आले आहे.

दरम्यान, देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत आयओसीने नागरिकांना कोणतीही अफवा किंवा चुकीची माहिती यावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. इंधन उपलब्धतेबाबतची माहिती केवळ अधिकृत स्रोतांकडूनच घ्यावी तसेच घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी टाळावी, असेही कंपनीने म्हटले आहे.

### ठळक मुद्दे

- महाराष्ट्रात डिझेल विक्रीत 31.5% वाढ
- बीड, अहमदनगर, सांगली, उस्मानाबाद, अकोला आणि नांदेडमध्ये सर्वाधिक वाढ
- कृषी हंगाम आणि ग्राहकांचा सार्वजनिक क्षेत्रातील इंधन केंद्रांकडे वाढता कल हे प्रमुख कारण
- पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध